श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर) संचलित

# दूधसाखर महाविद्यालय, बिद्री





# स्पंदन

२००७-२००८



*Toward Progress*





गुणगौरव समारंभाचे प्रमुख पाहुणे प्राचार्य सायनाकर यांचे हस्ते जनरल चॅम्पियनशिप स्विकारताना कु.दयानंद फराकटे,बी.एस्सी.३



शिवाजी विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय (इचलकरंजी) व मध्यवर्ती (फलटण) युवा महोत्सवातील यशस्वी कला[illegible]



प्रमुख अतिथी डॉ. आर.जी.देसाई यांच्या उपस्थितीत, हिंदी दिनानिमित्त बोलताना महाराष्ट्र बँकेचे व्यवस्थापक श्री.पोवारसाहेब



दांडेली अभयारण्यामध्ये बी.एस्सी.भाग ३,वनस्पतीशास्त्र अभ्यास सहलीतील विद्यार्थिनी



श्री.ह.मो.मराठे यांचा परीचय करुन देताना प्रा.एस्.ए.साळोखे



वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटनावेळी बोलताना डॉ. राजन [illegible]वस



"स्त्री- भ्रुणहत्या " मुकनाट्य सादर करताना आमचे विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ जिल्हास्तरीय युवा महोत्सव (इचलकरंजी)



"ग्लोबल वॉर्मिंग " पथनाट्य सादर करताना आमचे [illegible]र्थी, शिवाजी विद्यापीठ जिल्हास्तरीय युवा महोत्सव (इचल[illegible])

श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर )
संचलित

# दूधसाखर महाविद्यालय, बिद्री

वार्षिक अंक पंधरावा

# स्पंदन

सन २००७-०८

*** संपादक मंडळ ***

प्रमुख संपादक
*प्राचार्य डॉ. आर. एल. राजगोळकर*

कार्यकारी संपादक
*डॉ. एस. जी. गायकवाड*

विभागीय संपादक

*डॉ. एस. डी. पाटील - मराठी विभाग*
*डॉ. एस. बी. देसाई - हिंदी विभाग*
*प्रा. सी. वाय. जाधव - इंग्रजी विभाग*
*प्रा. एस. एस. पाटील - शास्त्र विभाग*

## स्थानिक व्यवस्थापन समिती

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | मा. आमदार कृष्णराव परशराम पाटील |
| उपाध्यक्ष | : | मा. सुनिलराज सुरेशराव सुर्यवंशी |
| सदस्य | : | मा. नामदेवराव शंकरराव भोईटे |
| सदस्य | : | मा. एकनाथ माणकोजी निकम |
| सदस्य | : | मा. जी. डी. पाटील |
| मुख्य सचिव | : | मा. एस. एस. चौगले |
| सचिव | : | प्राचार्य डॉ. आर. एल. राजगोळकर |
| शिक्षक प्रतिनिधी | : | प्रा. डॉ. एस. डी. पाटील |
| शिक्षक प्रतिनिधी | : | प्रा. एस. आर. पाटील |
| शिक्षक प्रतिनिधी | : | प्रा. एस. के. सावंत |
| शिक्षकेतर प्रतिनिधी | : | श्री. नामदेव विष्णू पाटील |


# हार्दिक शुभेच्छा !

* सभासद हित हेच आमचे ब्रिद *

**श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ सेवकांची सहकारी पतसंस्था,**

बिद्री ( मौनीनगर )

आकर्षक व्याजदर, तत्पर सेवा,

चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक मंडळ, मॅनेजर व सर्व सभासद

# श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर)



**मान.आमदार श्री.के.पी.पाटील**

चेअरमन,
श्री दूधगंगा-वेदगंगा सह.साखर कारखाना लि.बिद्री
अध्यक्ष,
श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री



**मान.सौ.मायावती के.पाटील**

अधिसभा सदस्या,
शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर



**मान.डॉ.आर.एल.राजगोळकर,**

प्राचार्य,
दूधसाखर महाविद्यालय बिद्री.



**मान.श्री.एस.एस.चौगले**

मुख्य सचिव,
श्री दूधगंगा-वेदगंगा सह.साखर का.लि.बिद्री
मुख्य सचिव,
श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ,बिद्री



# श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीन

## संस्था पदाधिकारी



**मा.सुनिलराज सु. सुर्यवंशी**
व्हा. चेअरमन, बिद्री कारखाना व उपाध्यक्ष
श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री



**मा.आर.डी.देसाई**
कार्य.संचालक,बिद्री कारखाना व मानद सचिव,
श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री



मा.नामदेवराव शं.भोईटे



मा.गणपतराव गुं. फराकटे



मा.विठ्ठलराव शि.खोराटे



मा.वंडोपंत कुं.पाटील



मा.बाजीराव ई.गोधडे



मा.नेताजी कुं.पाटील



मा.गणपती ज्ञा.पाटील



मा.केरवा द.पाटी

# श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर)

## संस्था पदाधिकारी


मा.के.जी.नांदेकर


मा.पंडीतराव द.केणे


मा.दिनकरराव भा.जाधव


मा.शशिकांत आ.पाटील


मा.राजेंद्र पां.पाटील


मा.सुनिलराव शि.कांबळे


मा. केशवराव शं.पाटील


मा.सौ.सविता भि.एकल


मा.सौ.सुवर्णा स.पाटील


मा.रमेश मा. वारके


मा.मधुकर गो.जाधव


मा.ए.वाय.पाटील



मान. आमदार श्री.के.पी.पाटील यांच्या हस्ते एन.एस.एस.विशेष शिबीराचे उद्घाटन,मुदाळ



मान.सरपंच श्री. रणजीत कृष्णराव पाटील, स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना.



मान.प्रा.हरिभाऊ वनमोरे, एन.एस.एस. … समन्वयक,शिवाजी विद्यापीठ,यांचे …



विशेष शिबीरातील स्वयंसेवकांची "ग्रामस्वच्छता जनजागरण" प्रभात फेरी, मुदाळ.



गटार स्वच्छता -एन.एस.एस. विशेष शिबीर, मुदाळ



विशेष शिबीरातील स्वयंसेवकांकडून तलावाची …



विशेष शिबीरातील हिप्नॉटीझम कार्यक्रमात प्रा.एस.जी.खानापुरे यांनी संमोहित केलेले विद्यार्थी.



दि. 2 ऑक्टोबर 2007, म.गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस अभिवादन



सी.पी.आर.हॉस्पिटल रक्तपेढीसाठी रक्त… एन.एस.एस.स्वयंसेवक



सी.पी.आर.हॉस्पिटलचे मा.शल्य चिकित्सक, प्रा.डी.के.शिंदे यांचेकडे प्रशस्तीपत्रे सुपूर्द करताना



सिद्धीविनायक मंदिर परिसर,तुरंबे येथे स्वच्छता करताना एन.एस.एस. स्वयंसेवक



मान.रघुनाथ पोवार, अध्यक्ष, सिद्धीवि…क ट्रस्ट, तुरंबे यांच्या हस्ते प्रा.शिंदे व प्रा.माने या… सत्कार



# Editorial

**Dr. R. L. Rajgolkar**
Principal & chief Editor

TOWARD PROGRESS......

Doodsakhar Mahavidyalaya, Bidri a saple planted in the year 1990 by a parent institutio Shri Doodhsakhar Shikshan Prasarak Mandal established by Shri. Doodhganga Vedgang Sahakari Sakhar Karkhana Ltd. Bidri. The college grown now and stepping ahead to com pete with modern world. The stakeholders of this institution are with the background c farming probably are in sugarcane growing area. The youngsters of rural and hilly area la behind because of lack of information and they consider themselves backward, where th facilities like information technology are not accessible. They are economically backwar and our main target is to remove complex from their mind. There are no advantages c concessions or additional faclities available to them because they come from rural area Our students will have to be in th open competition with the youths of urban area, who hav all the access to these modern techniques to their doorstep like information technology internet etc.

Now our task is to make arrangements to provide all these facilities to these students, s that they can be openly competing with the youths of their age group. Therefore our adv sory committee decided to start the courses which are important to develop career of th students. The following activities have been started in our institution from last academi year.

1. Remedial Coaching classes for SC/ST students.
2. Coaching Classes for Entry in services for SC/ST students.
3. Competitive Examination Guidance Centre.
4. BPO Training Centre.
5. Computer Laboratory.
6. B.Sc. Computer Science Optional Subject.

We have Planned to provide the facility of computer science subject up to graduatic level.Also we are eager to start a separate faculty of computer science (B.C.S.) at bachelor level and for that the proposal has been submitted to university for the approval. We als think to have facility of providing courses of international and national level like NIIT/MKC etc to the students of this area.

The hostel facility is available to the needy and poor girls in the factory colony from ne academic year, the construction is in progress for that college has received grant-in-aid Rs. 80,00,000/- from University Grants Commission, New Delhi.

I am very much confident about my endeavors and certainly I see my success in it.

## आमचे गुणवंत



**फराकटे दयानंद सदाशिव**
बी.एस्सी. भाग ३
**वार्षिक क्रीडा जनरल चॅम्पियन**



**चंद्रकांत भिमराव हंचनाळे**
बी.एस्सी. भाग २
**प्रथम क्रमांक १०० व २०० मी.**



**सदाशिव आकाराम पाटील**
बी.ए. भाग ३
**शिवाजी विद्यापीठ कुस्ती संघात नि**



**राणे संतोष गणपती**
बी.ए.भाग ३
**हिंदी स्कॉलरशीप**



**शीतल शंकर पाटील**
बी.ए.भाग १
**हिंदी स्कॉलरशीप**



**शोभा पांडूरंग रक्ताडे-पाटील**
बी.ए.भाग १
**हिंदी स्कॉलरशीप**



**रोहन राजेंद्र डोणे**
बी.ए.भाग १
**हिंदी स्कॉलरशीप**



**राजेश पांडूरंग डावरे**
बी.ए.भाग १
**हिंदी स्कॉलरशीप**

" अमृताते पुन्हा
पैजा मी लावीन
थोर भल्या भल्या
क्षणात जिंकीन "

- नारायण सुर्वे



# मराठी विभाग

विभागीय संपादक

प्रा. डॉ. संजय पाटील

# अनुक्रमणिका

## ( गद्य विभाग )


| | |
|---|---|
| ) अग्नीतले इंद्रधनुष्य – बाबा आमटे | प्रविण पाटील / ३ |
| ) ये युवका तू जागा हो | कु. निता पाटील / ४ |
| ) वडील | संदीप पाटील / ६ |
| ) प्राणायाम : काळाची गरज | कु. प्रज्ञा पाटील / ७ |
| ) ग्रामीण तरुणाई कोठे आहे? | शौकत शिकलगार / ९ |
| ) भारत २०२० | शरदचंद्र पाटील / १० |
| ) साथ | कु. पूनम पाटील / १२ |
| ) गुरु–शिष्य : एक अनमोल नातं | विनायक खाडे / १४ |
| ) बंध–अनुबंध | कु. मेघाराणी पाटील/१५ |
| ०) महाराष्ट्र : स्पर्धा परीक्षात मागे का? | विकास चौगुले / १६ |
| १) आळस हा मोठा रोग | कु. सुरेखा भोईटे / १८ |
| २) शेवटचा तो शेतकरी : असं का? | प्रमोद पाटील / १८ |
| ३) जात, धर्म आणि परिवर्तनाचा लढा | कृष्णात पाटील / २० |
| ४) अमेरिकेची कुटनीती | रविंद्र पाटील / २१ |
| ५) जीवनाचे मूलमंत्र | सुशांत पाटील / २२ |
| ६) प्रेमा तुझा रंग कसा? | संदीप फराकटे / २२ |
| ७) तारुण्याच्या वाटेवर | सचिन खाडे / २२ |
| ८) मसालेदार पत्र | संदीप पाटील / २३ |
| ९) सांजवेळ होताच येते तुझी आठवण | तुळशीराम बोडके /२३ |


## ( पद्य विभाग )


| | | |
|---|---|---|
| ) चारोळ्या | मेघराज फराकटे | ३ |
| ) उंबरठा | अमर पाटील | ५ |
| ) स्पंदन | दिपक पोवार | ८ |
| ) अबोल | विशाल पाटील | ९ |
| ) तू आणि मी | श्रीरंग पाटील | ११ |
| ) प्रेम | कु. प्रियंका पाटील | २० |
| ) चारोळ्या | श्रीकांत फराकटे | २४ |
| ) चारोळ्या | तानाजी हातकर | २४ |
| ) प्रिय | रणजीत अंगज | २५ |
| ०) नवं वर्ष | दयानंद हुजरे | २५ |
| १) अनामिका | दयानंद पाटील | २६ |
| १) Modernसावधान | सदाशीव पाटील | २६ |
| १२) प्रीत | सुयोग कोतमिरे | २६ |
| १३) असे नाही | पलवी पाटील | २६ |
| १४) गरज | कु. पूनम पोवार | २७ |
| १५) मैत्रिण | पवन चौगले | २७ |
| १६) एक नजर | अमित फराकटे | २८ |
| १७) प्रभाव गालिकांचा | संग्राम किल्लेदार | २८ |
| १८) जाता जाता तू विसरू नको | जोतिराम फराकटे | २८ |
| १९) आमची शान | राज नलवडे | २९ |
| २०) सौंदर्य | नवनाथ पाटील | २९ |
| २१) प्रेम कसं करायचं | प्रसाद खोत | ३० |
| २२) प्रेम | अमोल गुरव | ३० |
| २३) नशा | बळीराम पंडे | ३० |
| २४) कुणाला काय कळलेच नाही | रणजीत खोत | ३१ |
| २५) जीवनाच्या वाटेवर | दत्तात्रय फराकटे | ३१ |
| २६) मृत्यूला हाक | कु. पूनम गोते | ३१ |
| २७) शब्दांना शब्दांचा आधार | स्वप्नाली मांडवकर | ३२ |
| २८) आयुष्य संपत आलं की | स्मिता जिरगे | ३२ |
| २९) वेडं मन | विजय चांदणे | ३३ |
| ३०) कोणासाठी? | रोहन डोणे | ३३ |
| ३१) स्त्री भ्रूण हत्या | राजश्री पाटील | ३३ |
| ३२) बदललेल्या वाटेवर | उत्तम कळमकर | ३४ |
| ३३) ध्येय | वर्षा पाटील | ३४ |
| ३४) जीवनगाणे | सुप्रिया पाटील | ३४ |
| ३५) प्रतिक्षा | सागर चव्हाण | ३५ |
| ३६) काय माझा गुन्हा | सचिन राणे | ३५ |
| ३७) असं असतं कॉलेज | विशाल मगदूम | ३५ |
| ३८) मला ही वाटते | शुभांगी पोवार | ३६ |
| ३९) धोका | गुरुनाथ पाटील | ३६ |
| ४०) विद्यार्थी नापास का होतात? | शरद खोत | ३६ |
| ४१) साक्षरता | दिग्वीजय पाटील | ३७ |
| ४२) धन्य! ते छत्रपती शिवराय! | साताप्पा काशीद | ३७ |
| ४३) प्रेम | विशाल पाटील | ३८ |
| ४४) पीक | सागर गोरे | ३८ |
| ४५) एकच आयुष्य असतं | दत्ता पाटील | ३८ |
| ४६) थोरांचे विचार | सुशांत पाटील | ३९ |

# अश्रूतले इंद्रधनुष्य - बाबा आमटे

प्रविण विष्णू पाटील
बी. ए. भाग ३

समाजाने जगण्याचा हक्क नाकारलेल्या जगभरातील कुष्ठरोग्यांच्या मनात जिद्दीचा अंगार फुलविणारे, त्यांच्या डोळ्यात स्वाभिमानाचे निर्धार, स्वप्न पेरणारे आणि भान ठेवून योजना आखा व बेभान होऊन त्या अमलात आणा असे तरूणाईला आयुष्यभर सांगणारे उपेक्षितांचे कर्मयोगी म्हणजे बाबा आमटे होय. गडगंज संपत्ती व एल. एल. बी.पर्यंत शिक्षण झालेले असतानादेखील आनंदवन या नंदनवनाची निर्मिती बाबांनी केली.

असे म्हणतात 'प्रत्येक क्रांतीला बंडखोरीच जन्माला घालत असते.' बंडखोर प्रवृत्ती हीच क्रांतीची जननी असते. क्रांती कधी कधी विराम पावते. पण बंडखोरी शाश्वत असते. बाबा आमटे यांच्यात प्रकर्षाने जाणवली ती बंडखोरीच. या बंडखोरीतून 'हेमलकसा लोक बिरादरीची' स्थापना केली. अनेकांचे संसार फुलविले. त्यांची ही बंडखोरी साहित्य क्षेत्रातदेखील दिसून येते. 'ज्वाला आणि फुले' यासारखा त्यांचा काव्यसंग्रह म्हणजे कृतीशील माणसाच्या हाती त्यांनी दिलेले बौध्दिक होकायंत्रच होय. 'माती जगवेल त्याला मत' यासारख्या पुस्तकातून आपल्याला लोकशाहीचे महत्त्व समजावलं. 'भारत जोडो' या अभियानासाठी राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश प्रभावीपणे मांडण्यासाठी काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत, आसामपासून गुजरातपर्यंत त्यांनी सायकल यात्रा काढली. विस्थापकांच्या प्रश्नासाठी 'नर्मदा बचाव' आंदोलनात भाग घेतला.

त्यांच्या कार्याची पोचपावती म्हणून 'दि टेम्पलटन', 'रॅमन मॅगसेस', 'पद्मश्री', 'पद्मविभूषण', 'महाराष्ट्र भूषण', 'आंतरराष्ट्रीय गांधी शांतता पुरस्कार', इ. पुरस्कारांनी सन्मानीत करण्यात आले. अशा मानवतेचा उपासक, करुणेचा महासागर असणाऱ्या महामानवाचे महानिर्वाण १० फेब्रुवारी २००८ रोजी झाले.

त्यांच्या कृतीशील, कृतार्थ आणि त्यागाला अनोखा प्रीतीसंगम असणारे जीवन हेच अनेकांना प्रेरणादायी ठरले आहे. त्यांच्या जीवनाविषयी त्यांच्याच शब्दात म्हणावेसे वाटते

**माणूस माझे नाव**
**माणूस माझे नाव**
**दहा दिशांच्या रिंगणात**
**यापुढे माझी धाव**
**बिंदूमात्र मी क्षुद्र खरोखर**
**परी जिंकले सातही सागर**
**उंच गाठला गौरी शंकर**
**अग्नियान मम घेत चालले**
**अवकाशाचा ठाव**
**माणूस माझे नाव**

●●●

## चारोळ्या

मनात लपलेलं सारं काही
शब्दातूनी कधीच सांगता येत नाही
हृदयात विसावलेल्या पाखराची
आठवण कधीच पुसून जात नाही

जा तू कुठेही
जप तू स्वतःला
आडोशाला उभा राहून
पाहीन तुझ्या सुखाला

मेघराज कृष्णा फराकटे
बी. एस्सी. भाग १

# ये युवका तू जागा हो ।

कु. निता तुकाराम पा...
एफ. वाय. ...

दहा कोसावर प्राणी आणि वाणी बदलते. अशा विविधतेने नटलेल्या भारत देशात आज इतकी तफावत का? एकेकाळी युवक स्वातंत्र्य असूनही खंत वाटते की, आजचा युवक असा का भरकटत चालला आहे? आज आपण २१व्या शतकात वावरत असताना जे चित्र पाहत आहोत ते फारच भयानक आहे. एकीकडे विज्ञान तंत्रज्ञानाची होणारी प्रगती तर दुसरीकडे भारतीय संस्कृतीचा होणारा ऱ्हास आपण पाहत आहोत.

आज घराघरात टी. व्ही., रेडिओ, टेपरेकॉर्डर इ. सारखी प्रसार माध्यमे उपलब्ध आहेत. या माध्यमातून विविध चित्रपट कार्यक्रम दाखवले जातात. यामध्ये दाखवल्या जाणाऱ्या देखाव्यातून पार्ट्या, दारू, सिगारेट यासारख्या वस्तूंचा वापर वाढत गेल्या. पूर्वी एकच प्रसारमाध्यम होते. 'वर्तमानपत्र' या माध्यमातून सर्व माहिती मिळत असे. आज युवकांना वृत्तपत्र वाचण्यास वेळच मिळत नाही. कारण त्यांना वाचनात रसच नाही. खरंतर आजची वर्तमानपत्रे ही वाचण्यासारखी नाहीत याचं कारणही आजचा युवकच आहे. आज वृत्तपत्रात पहिल्या पानावर चोरी, बलात्कार, भ्रष्टाचार, प्रेम निराशेतून आत्महत्या वा खून इ. असते. याचे कारण ही आजची प्रसार माध्यमे आहेत. पण चित्रपट असो वा कार्यक्रम त्यामध्ये जे काही करतात त्याचे अनुकरण करायला प्रसारमाध्यमे सांगत नाहीत. त्यातून आपण काय घ्यायचं आणि काय नाही हे स्वतःवर अवलंबून असते पण मानवाचा गुणधर्मच आहे की तो वाईट गोष्टीचं अनुकरण लगेच करतो.

समाजात आज सर्वच सुशिक्षित आहेत. पण यात सुशिक्षित बेकारांची संख्या जास्त आहे. याचे कारण भ्रष्टाचार आज सर्व क्षेत्रात होत आहे. अगदी शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रातही आज काही मुले शिक्षणासाठी नव्हे तर टाईमपास म्हणून शाळेत-महाविद्यालयात जातात. आज महाविद्यालयामध्ये धमक्या देणे, गुंडगिरी करणे, मुलींची छेड काढणे, रॅगींग, शिक्षकांशी उर्मट वागणे इ. प्रकार महाविद्यालयात घडतात. पूर्वीची स्थिती अ... होती की,

> गुरूऽ ब्रह्मा गुरूऽ विष्णू
> गुरूऽ देवो महेश्वराऽऽ
> गुरूऽ साक्षात् परब्रह्म
> तस्मै श्री गुरवे नमः

यावरून लक्षात येते की, पूर्वी गुरूला श्रेष्ठ मानलं जा... होतं. पण आता गुरूंना काहीच किंमत दिली जात नाही. आ... पूर्णतः उलट स्थिती आहे. आज शिक्षणाला व शिक्षकांना काहीच मोल उरलं नाहीय.

आपल्या देशात आजवर विविध जातीचे धर्माचे लोक राह... आहेत. आज या युवकांत क्षुल्लक कारणातून वाद निर्माण हो... आहेत. जातीय दंगली होत आहेत. यामुळेच देशद्रोह्यांची संख्या वाढतेय. आज समाजात जाती- धर्मात नव्हे घराघरात वाद हो... आहेत. यामुळे विभक्त कुटुंबपध्दती निर्माण होत आहेत. दोन भाऊ विभक्त होतात व माता - पित्यांना वृध्दाश्रमात टाकले जाते. हे पूर्णतः चुकीचे आहे. हे विसरत आहेत की यांच्यावरही ही वेळ केव्हातरी येणार आहे. तसेच आजचे मंत्री पूर्ण जनतेची पिळवणूक करताहेत व देशावर विविध संकटे आणताहेत. ''चोर सोडून संन्याश्याला फाशी'' हेच विधान सत्य आहे. सर्व क्षेत्रात भ्रष्टाचार होत आहे.

पूर्वी कार्य किंवा समारंभ असेल तर मोठ्या आवाजात स्पिकरसारख्या माध्यमाचा वापर केला जात होता. आजकाल रोजच स्पिकरचा वापर होत आहे. उदा. होम थिएटर, टि. व्ही. यामुळे शांतता भंग पावत आहे. पाश्चात्य लोक आपल्या संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी व शांततेसाठी भारतात येतात. कारण ''शांतीविना सर्व वैभव तुच्छ आहे''. पण हे भारतीयांच्या केव्हा लक्षात येणार?

आपल्याला माहीत आहे की आज भारतीय संस्कृती लोप पावत आहे. यामुळे स्त्रियांची पिळवणूक होत आहे. आपल्या मातीत शिवाजी महाराजांपासून 'स्त्री'कडे आदराने पाहण्याचे संस्कार रूजले आहेत. पण आजचे युवक यास अपवाद आहेत. आज वर्तमानपत्र पाहिले असता किमान एकतरी बातमी अशी असते. युवतीवर बलात्कार, एकतर्फी प्रेमातून ॲसिड हल्ला, हुंडाबळी इ. आज २१व्या शतकातही स्त्रिया पुरुषांच्या अत्याचाराला बळी पडताहेत. अलीकडचीच बातमी आहे, कोल्हापूरमध्ये विद्या गायकवाड या पोलिस खात्यात काम करणाऱ्या युवतीवर एकतर्फी प्रेमातून ॲसिड हल्ला झाला व यात ती मृत्यू पावली. यावरून आपणास समजते की, स्त्री कितीही सुशिक्षित असली तरी ती सुरक्षित नाही. आज काही भागात सतीप्रथा, बालविवाह, पैशासाठी मुली विकणे, हुंडाबळी अशा घटना घडताहेत. आपण फक्त बघ्याची भूमिका घेतो हे वर्षानुवर्षे असंच चालत आलंय. कारण

"स्त्री जन्मा तुझी कहाणी
आँचल में दूध
नयन में पाणी"

अलीकडे बालगुन्हेगारीचे प्रमाण वाढत चाललं आहे. याचं मुख्य कारण म्हणजे आधुनिक युगाचं आरामदायी व चैनीचं जीवन होय. चैनीच्या वस्तू खरेदीसाठी किंमत मोजावी लागते, यामुळे चोरी, डाका यासारखी कृत्ये युवक करत आहेत. तसेच जुगार खेळणे इ. वाममार्गाचा अवलंब करत आहेत व आपल्या जीभेचे चोचले पुरवत आहेत.

वरील सर्व मुद्दे पाहिले असता लक्षात येतं की, युवा पिढी पूर्णतः भरकटत चालली आहे. युवकांची ध्येयं काय असायला हवीत व आजचे युवक ती ध्येयं काय ठेवताहेत. म. गांधी, म. फुले, टिळक, नेहरू, शिवाजी महाराज इ. सारखे तरुण या देशात पुन्हा केव्हा जन्मणार? ज्या मातीत परस्त्रीला मातेसमान – बहिणीसमान मानणारा युवक जन्मला तेथे स्त्रीवर अन्याय जुलुम करणारा युवक का जन्मला? पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करणारा युवक केव्हा भानावर येणार? व यांना आपल्या प्रगतीचा मार्ग केव्हा सापडणार? हे सर्व विचार जेव्हा मनात येतात व टाहो फोडतात तेव्हा म्हणावसं वाटतं

ये युवका तू जागा हो
तूच नवी दिशा आहेस
तूच नवी आशा आहेस
तूच देशाचा आधार आहेस
प्रथम तू जागा हो
सर्व व्यसन झुगारून दे
वृद्ध माता –पित्यांना आधार दे
गरिबाला भाकर दे
सीमेवरील शत्रूला झुंज दे
तू सर्वांना जीवन दे
ये युवका तू जागा हो---

## उंबरठा

घराघराचे घरपण जपतो संस्कारी हा उंबरठा
वडीलकीचे नाते सांगे, जागरूक हा उंबरठा ॥धृ ॥
उंबरठा हे प्रतीक आहे, सीमेचे, मर्यादेचे
लक्ष्मणरेषा, आत्मनियंत्रण, विचार योग्य – अयोग्याचे
क्षणाक्षणाला सावध करतो, मार्गदीप हा उंबरठा ॥१॥
प्रातःकाळी गृहिणी करीती, उंबरठ्याचे भाव पूजन
या उंबरठ्यावर होवो देवा, संत महात्म्याला वंदन
सुविचाराच्या प्रसन्नतेने सुगंधी होवो उंबरठा ॥२॥
मर्यादेचे पालन करूनी, मर्यादा सन्मान करू
'मर्यादा पुरुषोत्तम राम' हे ध्येय जीवनी साकारू
प्रभूकार्याची देई प्रेरणा, अध्यात्माचा उंबरठा ॥३॥

अमर गणेश पाटील

बी. ए. भाग ३

# वडील

संदीप तुकाराम पा
टी. वाय. बी.

आपल्या घराच्या अस्तित्वाकडे आपण कधी गांभीर्याने लक्ष दिलयं का हो? या घरातील व्यक्तिमत्त्वाचं आपण कधी निरिक्षण केलयं का? नाही ना? आपल्या घरासाठी, आपल्या कुटुंबासाठी आयुष्यभर झगडणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाची आठवण करून देण्याची वेळ येऊन ठेपलीय. घरात सतत वावर नसलातरी प्रत्येक क्षण आपल्या सोबत घराची काळजी घेऊन फिरणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाची आठवण करून द्यावीशी वाटते. आता तुम्ही म्हणाल आठवण - आठवण हे काय सारखं लावलयं यानं?

परवाच मी कोल्हापूरला गेलो होतो. माझा एक मित्र बऱ्याच दिवसांनी भेटला. जुन्या आठवणींना उजाळा देतच चहा घेण्यासाठी एका हॉटेलमध्ये शिरलो. आमच्या बाकावर बसलेली मुलं एकमेकांना त्यांच्या वडिलांच्या नावावरून बोलवत होती. सिगारेटच्या धुराबरोबर जणू आपल्या वडिलांची खिल्लीच उडवत होती. खरच खूप वाईट वाटलं. तिकडं आई - वडील काबाडकष्ट करून, स्वतःला पोटाला चिमटा काढून, काटकसर करून आपल्या मुलाला पैसे पाठवितात. हीच मुलं आपल्या वडिलांच्या पैशावर चैनी करतात. अरे जरा परिस्थितीची तरी जाणीव ठेवा.

मुलाला एखादा नवीन बूट आणतील, मुलीला चांगलं सँडेल आणतील पण स्वतः मात्र वीस - तीस रुपयाचं स्लिपर वापरतील. त्याच ते वापरून - वापरून झिजलेलं चप्पल बघितलं की समजते ती त्यांची काटकसर. मुलाला शिक्षणासाठी पैसे पाठवायचे असतात, मुलीचं लग्न करायचं असतं, घर चालवायचं असतं, सर्वांची काळजी यांनाच ! ऐपत न ताना मुलाला इंजिनिअरींग, डॉक्टरकी अशा साईडला घेऊन दिलेलं असतं. तो मागेल तितके पैसे पाठविले जातात. अगदी कर्ज काढूनदेखील आणि हाच मुलगा तिकडे या पैशांचा विनियोग वाईट गोष्टींसाठी करत असतो.

मुलग्याला एखादी जीन्स आणतील, मुलीला एखादा ड्रेस आणतील पण स्वतः एकच ड्रेस चार - पाच वर्ष वापरतं मुलगा केस कापण्यासाठी वीस - पंचवीस रुपये खर्च कर मुलगी ब्युटी पार्लरमध्ये खर्च करते पण हे शेव्हींग क्रीन ऐव साबण लावून दाढी करतात. तेव्हा समजते ती त्यांची कुटुंबा चाललेली धडपड.

घरात कुणी आजारी असेल त्याची काळजीही यांनाच. स्व मात्र आजारी असतील तरी काम करतील कारण मुलाचं शिक्ष मुलीचं लग्न, घरखर्च याचं टेन्शन. या व्यक्तिमत्त्वाचं वजन इत की कुणाची घराकडे वाईट नजरेनं बघायची काय बिशाद? घरात कुणी वारलं तर यांना मनमोकळेपणाने रडतादेखील येत नाही. लहान भावाला आधार द्यायचा असतो, लहान बहिणीला सावरायचं असतं, पत्नी अर्ध्यावर सोडून गेली की मुलांना सावरायचं असतं. मनात असून चेहऱ्यावर दुःख न दाखवणारा बापचं असतो, सर्वजण रात्री झोपल्यावर उशीखाली तोंड घालून मुसमुसत रडणारा बापच असतो.

"आपल्या कुटुंबावर वेड्यासारखं प्रेम करणारा,
स्वतःच्या इच्छा मारून
इतरांच्या इच्छा पूर्ण करणारा,
आपल्या कुटुंबाची काळजी घेणारा,
रात्री उशीखाली तोंड घालून मुसमुसत रडणारा,
आपल्या मुलीसाठी तिच्या सुखासाठी झटणारा,
मुलग्यासाठी पुढाऱ्याकडे विनवणी करणारा,
स्वतःसाठी काहीही न करणारा
बाप ! खरंच कित्ती ग्रेट असतो ना !"

# प्राणायाम : काळाची गरज

कु. प्रज्ञा रामचंद्र पाटील
एस. वाय. बी. एस्सी.

आजच्या धावपळीच्या युगात आपणही जगाबरोबर धावत चाललोय. यशाच्या उंच शिखरावर पोहचण्याची आपली धडपड चालूच आहे. मात्र ह्या जीवघेण्या स्पर्धेत दुर्लक्ष होत आहे ते अनमोल अशा शरीराकडे. शरीर सुदृढ असेल तर अशी उत्तुंग शिखरं आपण सर करू शकतो. सध्याच्या तांत्रिक युगात आपणही एक प्रकारचे यंत्र बनत चाललोय. हे कुठंतरी थांबायलाच हवं त्यासाठी गरज आहे योगाभ्यासाची, प्राणायमाची. विस्कळीत जीवनशैली, फास्ट फूड जमाना तसेच वाढते प्रदुषण यामुळे आपल्या शरीराला नाना प्रकारच्या व्याधी जडत आहेत. त्यासाठी प्राणायाम ही काळाची गरज आहे. त्याची थोडक्यात पण महत्त्वाची अशी तोंडओळख करून देण्याचा माझा हा छोटासा प्रयत्न.

मेडिकल सायन्सद्वारे फक्त जीवनरक्षक औषधांचाच लाभ माणसाला मिळतो. 'प्राणायाम' ॲनॉटॉमी फिजिऑलॉजीशी जोडलेला आहे. कारण त्यामुळे शरीरातल्या सर्व नसा, नाड्या, शुध्द होतात.

⁕ प्राणायाम :-

''आसनाची सिध्दी झाल्यावर श्वास – प्रश्वासांच्या गतीला रोखन म्हणजे प्राणायाम होय.'' जो वायू श्वास घेतल्यावर बाहेरून शरीराच्या आत फुफ्फुसात जातो त्याला श्वास (Inspiration) आणि श्वास बाहेर सोडल्यावर जो वायू आतून बाहेर जातो, त्याला प्रश्वास (Expiration) म्हणतात. प्राणायाम करण्यासाठी श्वास आत घेणं 'पूरकं', श्वासाला आत रोखून ठेवायला 'कुभंक' व श्वासाला बाहेर सोडणं याला 'रेचक' म्हणतात. अशा प्रकारे प्राणायाम करण्यासाठी पूरक, कुभंक, रेचक व बाह्यकुभंक क्रिया केल्या जातात.

*** प्राणायामच्या संपूर्ण सात प्रक्रिया ***

त्यापैकी चार महत्त्वाच्या प्रक्रियेची आपण अधिक माहिती घेऊ.

⁕ प्रथम प्रक्रिया – भस्त्रिका प्राणायाम :

⁕ द्वितीय प्रक्रिया – कपालभाती प्राणायाग :

⁕ तृतीय प्रक्रिया – बाह्य प्राणायाम :

⁕ चतुर्थ प्रक्रिया – अनुलोम – विलोम प्राणायाम :

⁕ पंचम प्रक्रिया – भ्रामरी प्राणायाम :

⁕ षष्ठ प्रक्रिया – ओंकार जप :

⁕सप्तम् प्रक्रिया – नाडीशुध्दी प्राणायाम :

१) प्रथम प्रक्रिया – भस्त्रिका प्राणायाम :

कुठल्याही ध्यानात्मक आसनात सुविधानुसार बसून दोन्ही नाकपुड्यांनी श्वास आत डायफ्रामपर्यंत भरा व बाहेरसुध्दा पूर्ण शक्तीने सोडा याला भस्त्रिका प्राणायामः म्हणतात. हा प्राणायाम ३ते५ मिनिटांपर्यंत करा.

लाभ – थायरॉइड व टॉन्सिल्स इ. गळ्याचे रोग दूर होतात.

२) द्वितीय प्रक्रिया – कपालभाती प्राणायामः

कपाल अर्थात मस्तिष्क आणि भातीचा अर्थ आहे दीप्ती, आभा, तेज व प्रकाश इत्यादी. जो प्राणायाम केल्याने मस्तिष्क म्हणजे माथ्यावर आभा, ओज, तेज वाढते ते प्राणायाम आहे कपालभाती.

कृती – कपालभातीत श्वासाला शक्तीपूर्वक बाहेर सोडण्यातच पूर्ण लक्ष दिलं जातं. पूर्ण एकाग्रता श्वासाला बाहेर सोडण्यातच होते. असे करताना स्वाभाविकरूपाने पोटसुध्दा आकुंचन व प्रसारणाची क्रिया होते.

समय – तीन मिनीटापासून सुरुवात करून पाच मिनीटापर्यंत सराव करावा.

फायदे –

१) मस्तिष्क व मुखावर ओज, तेज, आभा, सौंदर्य वाढते.

२) लठ्ठपणा, मधुमेह, गॅस इत्यादी सर्व रोग दूर होतात.

३) चतुर्थ प्रक्रिया – अनुलोम – विलोम प्राणायामः

डाव्या नाकपुडीने श्वास घेऊन उजव्या नाकपुडीने श्वास बाहेर सोडा. मग उजव्या बाजूने श्वास घेऊन डाव्या बाजूने श्वास बाहेर सोडा. ह्या प्राणायामात विश्राम घेतेवेळी अथवा बंद करतेवेळी शेवट श्वास डाव्या नाकपुडीतून सोडूनच करणे. तशीच कृती उजव्या नाकपुडीनेही करणे.

समय – हे प्राणायाम कमीत कमी पाच मिनीटे करणे गरजेचे आहे.

फायदे –

१) नकारात्मक चिंतनाचे परिवर्तन होऊन सकारात्मक विचार वाढू लागतात. आनंद, उत्साह व निर्भयतेची प्राप्ती होते.

२) थोडक्यात या प्राणायामाने तन, मन, विचार व संस्कार सर्व परिशुध्द होतात. देहाचे सर्व रोग नाहीसे होतात व मन परिशुध्द होते.

३) मन स्थिर, शांत व प्रसन्न राहते. एकाग्रता वाढते.

५) पंचम प्रक्रिया – भ्रामरी प्राणायाम :

श्वास पूर्ण आत घेऊन मध्यमा बोटाने नासिकेच्या सुरुवातीला डोळ्यांजवळ दोन्ही बाजूंनी थोडं दाबा. मनाला आज्ञाचक्रात केंद्रीत करा. आंगठ्याने दोन्ही कान बंद करा. आता भ्रमराप्रमाणे गूंजन करत नादरूपाने ॐ चा उच्चार करत श्वास बाहेर सोडा. पुन्हा असंच करा. अशाप्रकारे हा प्राणायाम तीन वेळा अवश्य करा.

लाभ – मनाची चंचलता दूर होते.

* महत्वपूर्ण सूचना –

१) हा प्राणायाम शुध्द, सात्विक, निर्मळ ठिकाणी करावा.

२) प्राणायाम हे नेहमी पूर्ण लक्ष केंद्रीत करून करावा.

नवीन वर्षाच्या निमित्ताने आपण सर्वजण संकल्प करूया की, योगा व प्राणायाम याला आपण बिझी शेड्यूलमधील किमान पंधरा मिनीटे देऊ व संपूर्ण देशच व्याधीमुक्त व निरोगी बनवू.

शेवटी फक्त एवढेच सांगेन की,

जसं अग्नीत तापण्याने सुवर्ण धातूंचे मळ, विकार नाहीसे होतात. तसेच प्राणायामाने इंद्रिय व मनाचे दोष दूर होतात.

**'' दिन की शुरवात,**
**प्राणायाम के साथ,**
**तो ही रहेंगे,**
**हर पल बिनधास्त.''**

संकलन – संदर्भ ग्रंथ
**प्राणायाम रहस्य, स्वामी रामदेव**
प्रकाशक – दिव्य योग मंदिर ट्रस्ट,
कृपाल बाग आश्रम, कगखल
हरिद्वार – २४९४०८, उत्तरांचल

## स्पंदन

नात्याला नावं दिली की,
नात्यावर बंधने येतात
निनावी जर नातं असेल
तर त्यात ह्दयाची स्पंदनं येतात
कल्पनांची स्पंदनं
भावनांची भाषा आहे
जागेपणाची स्वप्नं
आयुष्यातील आशा आहे !
साताजन्माचे ऋणानुबंध
नातं जरी अलिकडचं आहे
काय किती आणि कसं सांगू
हे नातं शब्दापलिकडचं आहे.

दीपक दिनकर पोवार
बी. ए. भाग १

# ग्रामीण तरुणाई कोठें आहे ?

शौकत शिकलगार
बी. ए. भाग ३

तरुणाई.... अर्थात सळसळते रक्त, ओसंडून वाहणारा उत्साह, नवनवीन फॅशन परंतु इतकेच म्हणजे तरुणाई का ? नक्कीच नाही. तरुणाई विविध अंगानी वेढलेली आहे. तरुणाईच्या योग्य वर्णनासाठी त्यास विजेची उपमा दिल्यास चूक ठरु नये. ज्याप्रमाणे विजेच्या योग्य व सुरक्षित वापराने अंधारावर मात केली जाऊ शकते परंतु तिच्या अयोग्य व असुरक्षित वापराने नुकसान होते, त्याप्रमाणे तरुणाईचे देखिल आहे. तरुणाईच्या योग्य व सुरक्षित वापरातून इतिहास घडवला जाऊ शकतो. मात्र त्यासाठी त्यांना हवी योग्य दिशा व मार्गदर्शन. आजही भारताच्या शहरी व ग्रामीण भागातील जीवनशैलीमध्ये खूपच तफावत असल्याचे जाणवते. शहरी तरुणांच्या मानाने ग्रामीण तरुण मागे पडल्याचे जाणवते.

शहरी तरुणांच्या जडणघडणीसाठी बऱ्याचशा अनुकूल गोष्टी उपलब्ध आहेत. सुसज्ज व अद्ययावत महाविद्यालये, विविध संस्थांमार्फत चालविली जाणारी मार्गदर्शन केंद्रे, खेळ, विविध शिबीरे ज्याद्वारे शहरी तरुण प्रगतीच्या दिशेने वाटचाल करु शकतो. त्या तुलनेत ग्रामीण भागात तरुणांना इच्छा असूनही; योग्य दिशा न मिळाल्याने प्रगती साधता येत नाही. ग्रामीण भागातील मुलभूत गोष्टींची कमतरता यातील एक प्रमुख कारण आहे. उच्च शिक्षणासाठी सर्वांनाच शहराकडे येणे शक्य होत नाही. बहुतेकांची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने शहरात जाऊन शिक्षण घेणे परवडत नाही. त्यामुळे नाईलाजाने असा तरुण वर्ग शिक्षणापासून वंचित राहून वेगळा मार्ग पत्करतो व प्रगतीपासून दूर जातो.

बऱ्याचशा आधुनिकतेचा अवलंब करण्याच्या विचाराने आजचा ग्रामीण तरुण अनावश्यक सवयींमध्ये अडकलेला दिसतो. काही ठराविक बाबींचा वापर केल्याने आपण शहरी तरुणाप्रमाणे दिसू या गैरसमजूतीमधून असे प्रकार झाल्याचे दिसते. व्यसनाधीनता ही त्यापैकीच एक.

ज्या समाजात शहरी सुविधा अत्याधुनिक बनत आहेत तिथेच ग्रामीण भागातील सुविधादेखिल तितक्याच सक्षम असल्या पाहिजेत. आज शहरी माणूस चंद्रावर जाण्यास निघालेला असताना ग्रामीण माणूस खड्ड्यामध्ये अडखळला आहे. ग्रामीण भागात रस्ते, पाणी, वीज, रोजगार यांचा तुटवडा वाढतच चालला आहे. विजेच्या लपंडावात रॉकेलच्या दिव्याखाली अभ्यास करणारा व खड्ड्यामधून मार्ग शोधत शाळेपर्यंत मार्ग काढणारा ग्रामीण विद्यार्थी आजच्या स्पर्धेच्या युगात टिकू शकेल का? याचा विचार होणे गरजेचे आहे. शहरी व ग्रामीण भागातील अंतर दूर करून शहराप्रमाणे अत्याधुनिक सुविधा प्राप्त करून दिल्या तरच उद्याची ग्रामीण तरुणाई प्रगती करु शकेल. म्हणून,

**''गड्या आपला गावच करूया भारी.''**

## अबोल

वाटत होते विचारावे
पण धाडस झाले नाही
स्वप्न साकारायचे होते
पण जाग च आली नाही
प्रेम भावनांना माझ्या मनात
लपवत ठेवत गेलो
हृदयातील तुझ्या स्मृतीला हळूवार जपत गेलो
भेटणे आता पुन्हा नाही
संपत आला तुझा सहवास
पण तुझ्याच आठवणीवर
चालू राहील माझा श्वास

विशाल पाटील
बी. एस्सी. भाग १

# भारत २०२०

शरदचंद्र शंकर ...
बी. एस्सी ...

"पन्नास वर्षांच्या अविरत चिंतनातूनही मला प्रकाशकणांचे स्वरूप अजून उमजलेले नाही." असे म्हणणारे अल्बर्ट आईनस्टाईन आणि खरोखरच कॉलेजच्या वयामध्ये सर्वात जास्त शक्ती, कार्यक्षमता, बुध्दिमत्तेची झळाळी, उत्साह असणारी तरुण पिढी टिव्हीवरील मालिकेतील अफेअर्समध्ये मन गुंतून किंवा काहीही न करता ध्येय शून्य होऊन आयुष्य जगत आहेत. दुर्दैव आहे भारताचे, सुदैव भारतातील राजकारणाचं, भ्रष्ट व्यवस्थेचं आणि स्वतःचा विचार करणाऱ्या अप्पलपोटी जनतेचं !!!

"भव्य स्वप्ने पहा, स्वप्नांचा ध्यास घेतला की विचार स्फुरतात आणि विचाराच्या दिशेने कृती होते." असे सांगणारे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम ज्यांनी स्वतः कृती केली आणि त्या रस्त्यावर भारतीय युवकांना जाण्यास प्रवृत्त केले. रामेश्वरम खेड्यातील एका गरीब नावाड्याचा मुलगा आपल्या जबरदस्त इच्छाशक्तीमुळे, अथक प्रयत्नाने, जिद्दीनं, आत्मविश्वासाने आणि परमेश्वरावरील श्रध्देनं विद्येची कास धरतो आणि भारताचा 'मिसाईल मॅन' होतो. भारताचा पहिला नागरिक म्हणून राष्ट्रपतीपदावर विराजमान होतो. उपलब्ध साधनसंपत्ती आणि नव्या तंत्रज्ञानानं आज भारत जागतिक स्पर्धेत मानानं उभा आहे. त्यामागे पंडित जवाहरलाल नेहरूंचा वैज्ञानिक दृष्टिकोन होता. नेहरूंचे हे स्वप्न साकार करायला सुरूवात डॉ. होमी भाभांनी केली. डॉ. साराभाईनी ते पूर्ण करण्याचा जणू विडाच उचलला आणि डॉ. कलाम यांनी व्यापक दृष्टी दिली. इ. सन २०२० पर्यंत किंवा जमल्यास त्याच्याही आधी प्रगत भारत उभा करण्याचे ध्येय भारतीय युवकांच्या समोर ठेवले. तसेच भारतीय नेत्यांनाही प्रगती करण्याची दिशा दिली.

भारत २०२० पर्यंत महासत्ता बनवणे हे केवळ हस्तिदंती मनोऱ्यात बसून वितारलेले मिथ्य स्वप्न नव्हे, पोकळ आशावादही नव्हे किंवा आकर्षक शब्दांची आतषबाजी करणेही नव्हे खरे तर ही शिक्षण, तंत्रज्ञान, विज्ञान, सरकारी प्रशासन, उद्योग, विविध प्रयोगशाळा इत्यादी अनेक क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण काम करणाऱ्या तज्ञांचा या प्रकल्पात सहभाग होता. प्रत्यक्षाप्रत्यक्ष अंदाजे ... तज्ज्ञ प्रकल्पात सहभागी झाले होते. या सर्वांकडून ... माहितीचे, विचारांचे, अहवालांचे, प्रश्नांचे संस्थेतील ... आणि उपसमित्या यांनी परिशिलन करून एक अहवाल ... केला. आणि २ ऑगस्ट १९९६ रोजी माननीय प्रंतप्रधानांनी ... अहवाल प्रकाशित केला.

आज आपला देश इंग्रजांच्यापासून स्वतंत्र होऊन ५० ... होऊन गेली. परंतु हा देश स्वतंत्र होण्यासाठी राजगुरू, भगतसिंग, सुखदेव, विष्णू पिंगळे, जतिंद्रनाथ दास असे अनेक ... क्रांतीकारक; तारूण्यात आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या ध्येयासाठी आणि आपल्या भारत मातेसाठी हसत हसत मृत्यूच्या स्वाधीन झाले. परंतु आत्ताचा युवा वर्ग जो देशाच्या ड्रायव्हिंग सिटवर बसला असला पाहिजे असे म्हणतात ते एकीकडे सगळ्यात मागच्या कोपऱ्यातील आरामदायक सिटवर बसून मजा लुटत आहे. पण या देशाचे जबाबदार नागरिक म्हणून आपलीही कर्तव्ये आहेत. प्रदुषण थांबवण्यासाठी योग्य उपाय करा. झाडे, जंगलाचे महत्व देशाला पटवून द्या. वैयक्तिक स्वार्थ पहाण्यासाठी सत्ता आणि खुर्चीसाठी पळापळ करणाऱ्या नेत्यांना त्यांची जागा दाखवून द्या. देशातले नव्हेतर एकाच देशातले पक्षापक्षातले संघर्ष थांबवा.

यामध्ये प्रत्येक व्यक्तीस नेता बनवून द्या. युवा शक्तीला दिशा दाखविता येणार नाही. पण युवा वर्गात आक्रमक ... असली पाहिजे. या सर्वांमध्ये आवश्यकता आहे, देशभक्तीची ... प्रामाणिकतेची, आत्मविश्वासाची आणि त्याग करण्याची ... ठेवण्याची. आज आपण ज्या देशांना समृद्ध - संपन्न पहात आहोत त्यांच्या आधीच्या पिढ्यांनी भरपूर कष्ट घेतले आहेत आणि त्याचीच फळे ते सध्या भोगत आहेत. याउलट आपण असा विचार करतो आम्ही आता काय वाईट जगतोय? ...

कोण लक्षात घेतं की, अशी भावनाच मुळी श्रीमंतांच्या घरी रजईवर लोळणाऱ्या कुत्र्यासारखी आहे.

बेरोजगारी, गरिबी, शिक्षण, लोकसंख्या अनेक समस्या आहेत. परंतु यांच्यावर मात करण्यासाठी आवश्यकता आहे, स्वतःवर विश्वास ठेवण्याची, आत्मविश्वासाने आणि समर्पित भावनेने, धैर्याने समोरच्या समस्यांना तोंड देण्याची. भारत महासत्ता होण्यासाठी काय कमी आहे? देशात साधन– संपत्ती अमाप आहे. लोकसंख्या तर जगातल्या देशाच्या तुलनेत दोन नंबरची आहे. आपल्यात अध्यात्म हे उपजत आहे. त्याची नव्या ज्ञान – विज्ञान – तंत्रज्ञानाशी आपण सांगड घालू शकतो. आपणही महासत्तेची वाट चोखाळू शकू. भारत २०२० साली महासत्ता अवश्य बनेल.

वयाच्या ८२व्या वर्षी नोबेल पारितोषिक विजेते सर सी. व्ही. रामन यांनी तरुण पदवीधरांना उद्देशून एक भाषण केले होते. त्यात त्यांनी सांगितले होते. तरुण मुलामुलींना मला सांगावेसे वाटते की, अजिबात निराश होऊ नका. समर्पित भावनेने, धैर्याने समोरच्या समस्यांना भिडले की यश पदरात पडते. आपल्या देशातील तरूणांची मनोवृत्ती, बुध्दी आणि प्रगत देशातील तरूणांची ट्यूटॉनिक, नॉर्डिक वा ॲग्लोसॅक्सन धर्तीची मनोवृत्ती एकाच ताकदीची आहे. आपण धैर्य आणि साहस यांत मात्र कमी पडतो. साहसी वृत्तीने माणूस कुठच्या कुठे जाऊन पोचू शकतो. आपण पराभूत आहोत, असा एक न्यूनगंड भारतीयांनी मनामध्ये उगाचच जोपासला आहे. या मनोवृत्तीचे सरळ उच्चाटन केले पाहिजे. विजयी वृत्ती हवी. स्वतःवर विश्वास हवा. आपल्याला उज्वल संस्कृतीचा वारसा लाभला आहे. त्यामुळे या जगात उच्च स्थान प्राप्त करणे हा आपला हक्क आहे. पराभूत मनोवृत्तीचा त्याग करून आपण अगम्य साहसवाद अंगी बाणवला तर आपण उज्वल भविष्याला खेचून आणू शकतो.

कुठल्यातरी उदात्त ध्येयासक्तीने पेटून उठलेले तरूण ही माझ्या मते कुठल्याही राष्ट्राची सर्वात मौल्यवान मालमत्ता आहे. तेव्हा तरूण मित्रांनो, विकसनशील असलेल्या आपल्या मायभूमीला विकसीत आणि प्रगल्भ करण्याच्या कामी आपण सर्वच लागू या. ही क्रांती दृश्य स्वरूपात येण्याआधी तिने आपल्या मनात जन्म घेऊन आपली मने चेतवली पाहिजेत, हे लक्षात घ्या, म्हणून महान त्या परमेश्वराकडे एकच मागणे की त्याने अशी संपत्ती द्यावी.

– आल्बर्ट आईनस्टाईन सारखी अपार कष्ट करण्याची जिद्द.

– डॉ. कलाम यांच्यासारखी जबरदस्त इच्छाशक्ती.

– थोर क्रांतीकारकांच्यासारखे देशप्रेम.

– सर सी. व्ही. रामन याच्यासारखी अंतःकरणातील उर्जा

मित्रांनो, अथांग आकाशाला गवसणी घालणाऱ्या गरूड पंखाचे सामर्थ्य तुमच्या लेखनीला लाभो, म्हणूनच सांगावेसे वाटते.

**"उंच घे भरारी**
**दिशाची वान नाही.**
**आड येईल तुला**
**असे एक ही तुफान नाही."**

●●●

# तू आणि मी

माझे माझे असे काही, ते ते तुझे सर्व झाले
हाती हात, ओठी शब्द, काळीज तुला ओलीस दिले
देह तुझा श्वास माझा, तव ओठाने मी बोलत होतो
दोन वातीची एक ज्योत, असेच आपण जळत होतो
प्राजक्ताचे मन माझे, गंध तुझा घेऊन फुलत होतो
तुझ्यातच मी माझ्यातच मी, एकमेकाहून अलग नव्हतो
माझ्या पायी रूते काटा, अश्रू मात्र तुझ्या डोळा
परस्परासाठीच जन्मलो, समज झाला असा खुळा
तुझ्यातच असे पूर्ण विरघळून, माझा कुठे न मी अंश ठेवीला
प्रीतीच्या या डावात अखेरीस, फुलानेही दंश केला

श्रीरंग पाटील
बी. ए. भाग ३

# साथ

कु. पूनम चंद्रकांत पाटील
बी. ए. भाग

खरं तर ! तो एका खेडगावातून गरीब घराण्यातून शहरात शिक्षण घेण्यासाठी आलेला एक हुशार तरुण होता. तो दिसायला सुंदर, सुशील असा होता. गोरा रंग, रेखीव शरीर, काळेभोर डोळे, भव्य ललाट, गालावर पडणारी नाजुकशी खळी, हवेच्या झोक्यावर झळकणारे केस असे कोणालाही मोहून टाकणारे त्याचे सौंदर्य होते. तसा नेहमी कॉलेजमध्ये व खेळात पहिला येणारा, प्रत्येकाच्या भावना समजावून घेणारा, विनोदी व ताऱ्यासारखा चमकत राहणारा 'सुरज' होता. माझा दादाही त्याच्या वर्गात शिकत होता. दोघे एकमेकाचे चांगले मित्र होते. अगदी दोघे एकमेकापासून दूर राहू शकत नव्हते.

प्रथम जेव्हा तो आमच्या घरी आला. त्यावेळी मी त्याच्यासमोर खुर्चीत पेपर वाचत होते. दादाचे तसे घरी रोजच मित्र येत असत म्हणून मी त्याच्याकडे लक्ष दिलेच नाही. पण हा दादाचा मित्र इतका शांत व गप्प बसला होता व घरातल्या प्रत्येक वस्तूकडे पहात त्याची स्तुती करत होता. नाहीतर दादाचे मित्र आले की नुसती कानात बोटे घालून बसायला लागते. म्हणून मी पेपरमधून तोंड बाहेर काढले व त्याच्याकडे पाहिले व पहातच बसले. त्याच्या तेजस्वी दृष्टीने मला मोहून टाकलं होतं. त्याच्या व्यक्तीमत्त्वानं मला जिंकून घेतलं होतं. त्याच्या ओठावरील स्मित हास्याने मला मोहीत केलं होतं. नजरेला नजर भिडली होती. त्या नजरेतून प्रेमाचे इशारे वाहत होते.

तेवढ्यात दादा पाणी घेऊन आला म्हणून मी तिथून उठले व खोलीत निघून गेले. थोड्यावेळाने दादाने घरातल्या मंडळींची ओळख दिली. त्याच्या सुंदर, रुबाबदार व्यक्तिमत्त्वामुळे त्याने घरातल्यांना सहज जिंकून घेतले. सुरज आता रोजच घरी येत होता. प्रत्येकजण त्याची स्तुती करत असे. पण मी आपणहून कधीही त्याच्यासमोर आले नव्हते. आम्ही दोघे एकमेकांना डोळे भरून पहात होतो. पण कधी बोलत नव्हतो. असे अनेक दिवस गेले. एक दिवस मी लवकर कॉलेजमधून घरी आले होते. घरी कोणीच नव्हते. मी चालल्यामुळे खूप दमले होते. मग फ्रेश होऊन हॉलमध्ये टेप लावून तेथेच झोपले. अचानक दार उघडून कोण आत आले म्हणून मी पटकन उठले पहाते तर काय सुरज माझ्यासमोर उभा होता. त्याला पहाताच माझ्या अंगातील शक्ती संपल्यासारखी वाटत होती. भितीने अंग कापत होते. तोंडातून एक शब्दही बाहेर पडेना, बस्स मान खाली घातली व आत निघाले. एवढ्यात तो म्हणाला, ''थांब ना '' त्याच्या आवाजाने मी जिथल्या तिथे थांबले. तो माझ्या जवळजवळ येत होता. त्याच्या पावलांच्या आवाजाने माझ्या हृदयाचे ठोके वाढत होते. तो माझ्यासमोर येऊन उभा राहिला. मी मान खाली घालून उभी होते. त्याने हळूच माझा हात हातात घेतला. व माझी मान दुसऱ्या हाताने वर केली. आम्ही दोघेही एकमेकांच्या डोळ्यात बघत होतो. तो काहीतरी सांगायचा प्रयत्न करीत होता. पण तेवढ्यात दारावरची बेल वाजली. माझा हात त्याच्या हातातून निसटला व मी आत गेले. सुरजने दार उघडले तर दारात दादा उभा होता. खूप दिवसांनी भेटल्यामुळे दोघेही आत येऊन गप्पा मारत होते. सूरजला येऊन खूप वेळ झाला होता. म्हणून निघून गेला होता व दादा दमल्यामुळे फ्रेश होण्यासाठी गेला.

दिवस निघून जात होते. उजाडलेला दिवस मावळत होता. सूरजने मला आपलं बनवलं होतं. दोघेही एकमेकांपासून दूर राहू शकत नव्हतो. आम्ही रोजच भेटायचो. आमच्या भेटण्याने तेथील वातावरण सुगंधमय होऊन जायचे त्याचा आवाज माझ्या कानात घुमत राहायचा. त्याच्या सहवासात एक एक तास सेकंदासारखा वाटायचा. वाटायचे तो क्षण कधीही येऊ नये की आम्ही दोघेही दूर होऊ. पण सूरजला गावी जाऊन आईला आधार द्यायचा होता. बहिणीचे लग्न थाटात करायचे होते. पण त्याची तब्येत सारखी बिघडत होती. मला वाटायचे अभ्यासाच्या तणावामुळे होत असेल. त्याची परीक्षा खूप जवळ आली होती. त्याला चांगल्या मार्कांने पास व्हायचे होते म्हणून

मी त्याला विशेष भेटण्याचे सोडून दिले. पण त्याला रोज चोरून पहायचे. परीक्षेच्या पहिल्या दिवशी सूरज सकाळी घरी आला. सगळ्यांचे आशीर्वाद व माझे बेस्टलक घेऊन निघून गेला. पाहता पाहता परीक्षाही संपली. दोघांनाही पेपर चांगले गेले. पण सूरज मात्र खूप बदलला होता. तो बारीक व अशक्त वाटत होता. पण काही विचारले तर उडवाउडवीची उत्तरे देत असे. त्यामुळे त्याच्याकडे कोणी सहसा लक्ष देत नसे. काही दिवसांनी परीक्षेचा निकाल लागला. सूरज महाराष्ट्रात प्रथम आला होता. तर दादा दुसरा. प्रत्येकाच्या तोंडात सूरजची स्तुती ऐकायला मिळत होती. शहरात त्याचा मोठा सत्कार केला. दुसऱ्या दिवशी सूरज पेढे घेऊन घरी आला. मी कॉलेजमधून आले नव्हते. त्यामुळे तो वाट बघून निघून गेला. मी घरी आल्यावर सूरज पेढे घेऊन आला होता असे समजले. मला खूप वाईट वाटले. माझी वाट पाहून रागाने गेला असेल. मी खूप निराश झाले. कशातच लक्ष लागेना म्हणून गॅलरीत येऊन उभी राहिले तर सूरज खाली रस्त्यावर उभा होता. त्याने एक छोटीशी चिठ्ठी वर टाकली व निघून गेला. त्याने मला संध्याकाळी ७ वाजता आपल्या खोलीवर बोलवले होते. एवढ्यात दादा ओरडत वरती आला. माझ्या हातात चिठ्ठी पाहून त्याचे डोळे रागाने लाल भडक झाले होते. माझे अंग भीतीने थरथर कापत होते. डोळ्यातून अश्रूच्या धारा वाहात होत्या. दादाने मग जरा हसरा चेहरा करून मला म्हणाला की, 'कुणाची चिठ्ठी'. माझ्या तोंडातून शब्दच फुटेना. 'घाबरू नकोस, काय सत्य आहे ते सांग'. ह्या अवस्थेत माझ्या थरथरत्या ओठातून शब्द बाहेर पडला, 'सूरज'. त्याचबरोबर दादाचा चेहरा प्रसन्न झाला व माझ्याजवळ येऊन माझा हात धरला व म्हणाला, 'अगं वेडे सूरजसारखा साथी मिळायला नशीब पाहिजे आणि ते तुला मिळाले हे तुझे भाग्यच आहे', असे ऐकल्यावर मी तर भांबावूनच गेले.

मी संध्याकाळी सूरजला भेटण्यासाठी गेले. त्यावेळी तो खिडकीच्या समोर उभा राहून दूर अस्ताला जाणाऱ्या सूर्याचे प्रतिबिंब आपल्या डोळ्यात सामावून घेत कोणत्यातरी विचारात मग्न होता. मला वाटत होते की, याला एकांतातून उठवू नये पण माझ्या पैजणांच्या आवाजाने त्याची एकाग्रता भंग पावली. त्याने चटकन मागे वळून पाहिले. त्याने मला बसण्यास सांगितले. खूप दिवसांनी भेटलो होतो. त्यामुळे बोलायला खूप काही होते पण त्याला बोलताना धाप लागत होती. मधून- मधून खोकलाही येत होता. पण आपल्याला काही झालेले नाही असे तो भासवत होता. आमचे बोलून झाल्यावर सूरज चहा आणण्यासाठी बाहेर गेला. तिथे अनेक प्रकारची पुस्तके होती. पण माझी नजर सूरजच्या डायरीवर गेली. मी ती घेऊन वाचत असताना त्यामध्ये 'मेडिकल रिपोर्ट' मिळाले. मला प्रथम आश्चर्य वाटले पण म्हणाले वाचून पहावे. मी रिपोर्ट उघडले तर पेशंटच्या नावापुढे सूरजचे नाव होते व डायग्नोसीस कॉलपुढे लिहीले होते 'ब्रेन ट्युमर'. माझ्या हातातली डायरी व रिपोर्ट खाली पडले. त्यासरशी माझ्या हृदयात जोराची कळ आली की मी तशीच खाली बसले. अंग घामाने चिंब झाले होते. डोळ्यातून अश्रूच्या धारा वाहू लागल्या. मनात अनेक प्रश्नांनी थैमान घातले होते. सूरजने आपल्यापासून का लपवून ठेवले? इतक्यात सूरज चहा घेऊन आला. माझी अवस्था बघून त्याला सर्वकाही समजले. त्याने चहा टेबलवर ठेवला व माझ्याजवळ आला आणि माझ्या डोळ्यातील अश्रू पुसू लागला व म्हणाला, श्वेता, मी आता तुझा राहिलो नाही. मी तुला माझी बनवू शकत नाही. माझी सर्व स्वप्ने अपूर्णच राहणार आहेत. आईची सेवा माझ्या नशिबी नाही. बहिणीचे लग्न मी पाहू शकत नाही. माझा जन्म झाला नसता तर बरं झालं असतं. निदान दुसऱ्यांना त्रास तर झाला नसता. माझ्या शिक्षणाचा काय उपयोग झाला. मी कुणालाच काही देऊ शकत नाही. त्याचे आघात करणारे शब्द माझ्या कानावर विजेसारखे तडकत होते. त्याचे बोलणे ऐकून इतके वाईट वाटले की त्याचा आवाज दाही दिशांना पसरत होता. त्याचवेळी त्याला चक्कर आली. तो कोसळणार इतक्यात मी त्याला सावरलं व त्याला बिछान्यावर झोपवले. मी घरी सगळ्यांना फोन करून इकडे बोलावून घेतले. सूरजला हॉस्पिटलमध्ये नेले. दादाने सूरजच्या आईला व बहिणीला बोलावून घेतले. त्याच्या आईने तर तिथे रडायला सुरुवात केली. त्यांना सूरजशिवाय कोणी नव्हते. सूरजला आता कोणीच वाचवू शकत नव्हते. सर्वजण त्याच्याभोवती जमा झाले होते. सर्वांच्याकडे सूरज डोळे भरून पहात होता. तो प्रत्येकाला धीर देत होता.

दादाला जवळ बोलावून, त्याने 'माझ्या बहिणीशी लग्न कर व आईला आधार दे', असे सांगितले. दादाने हुंदका आवरत त्याला वचन दिले सूरजने माझा हात आपल्या हातात घेऊन माझ्या हाताने आपल्या आसुसलेल्या ओठांचा स्पर्श केला व नकळत त्याच्या हातातून हात सुटला व त्याची मान एका कडेला पडली. मी एकदम ओरडले. सूरज खूप दूर निघून गेला होता. त्याला माघारी कोणीही आणू शकत नव्हते तो सर्वांना हवा होता. पण.......

सूरजच्या जाण्याने माझे जीवन अंधाराने भरलेल्या खोलीसारखे झाले. मी त्यातून सावरू शकत नव्हते. क्षणोक्षणी सूरजच्या आठवणी ताज्या करीत होत्या. रात्रंदिवस त्याच्या विचारात मग्न असायचे. त्याच्या आठवणींचा सहवास माझ्या सभोवती पसरला होता. त्याचा आवाज माझ्या एकांतलेला भुरळ घालायचा. सूरज जीवंत नाही हे सत्य मी आता स्वीकारू शकत नव्हते कारण माझा सूरज नेहमी माझ्याजवळ प्रकाशासारखा प्रखर असणाऱ्या आठवणी समवेत मला साथ देणार आहे......

•••

# गुरू - शिष्य : एक अनमोल नातं

कु. विनायक लक्ष्मण खाडे
बी. ए. भाग ३

गुरू ईश्वर तात माय
गुरूविन जगी थोर काय....?

खरोखरच गुरूविषयी लिहिलेल्या दोन ओळी खूप काही सांगून जातात. गुरू हा केवळ 'गुरू' नसतो तर 'गुरू' या शब्दाभोवती माता, पिता, मित्र, मार्गदर्शक अशी कितीतरी नाती गुंफलेली असतात. विद्यार्थ्यांच्या या जीवनात प्रत्येक नात्याचं महत्त्व वेगळं आहे. माता ही मुलाची पहिली गुरू असते. हेच लहान मुल जेव्हा शाळेत जाऊ लागते तेव्हा गुरूला त्याला मातेचं प्रेम द्यावं लागतं. पित्याच्या जबाबदारीनं त्याच्याकडे लक्ष द्यावं लागतं. म्हणजेच घराच्या सुरक्षित छताखालून जेव्हा मूल शालेय विश्वात प्रवेश करतं तेव्हा त्या मुलाचे आई - वडील गुरु हेच असतात.

गुरूला मित्र नेहमीच संबोधलं जातं. या संबोधनातून विश्वासाचं नातं निर्माण होत असतं. गुरु आपल्या शिष्याला विश्वासात घेऊन मार्गदर्शन करीत असतो तर शिष्याचा गुरूवर विश्वास वाढत असतो. काही गोष्टी विश्वासानं आपण मित्राला सांगत असतो व मित्रही त्या विश्वासाला जागून मार्ग काढत असतो. खऱ्या गुरु-शिष्याचं नातं हे काहीसं असंच असावं लागतं.

ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल भले कितीही वाद असले तरी 'गुरू' हा पृथ्वीतलावरील मानवाला भेटलेला ईश्वरच आहे. गुरूने दिलेले ज्ञान हे ईश्वरी वरापेक्षा निश्चितच कमी नसते. या नात्यामध्यें कोणतीही भिंत उभी न करता या नात्याचं पावित्र्य जपणं हेही तितकच महत्वाचं आहे.

•••



# बंध - अनुबंध

कु. मेघाराणी पाटील
बी. ए. भाग ३

आज पटकन आवरून कॉलेजमध्ये जाण्याच्या घाईत होते. दिवसच तसा आनंदाचा होता. बऱ्याच वर्षांनी कॉलेजमध्ये 'गेट टूगेदर' आयोजित केला होता ना.... परत एकदा सर्व मैत्रिणी एकत्र भेटणार होतो.

कॉलेजची एक एक पायरी चढत असताना एक कागद समोर येऊन पडला. तो वर उचलून मी वाचण्यास सुरवात केली. परत एकदा कॉलेजच्या दिवसांची आठवण झाली. त्या कागदावर चार ओळी लिहिल्या होत्या. त्या अशा होत्या.....

**आयुष्याच्या प्रत्येक पायरीवर**
**आपलं कुणीतरी असावं**
**प्रवेशाच्या पायरीवर आशीर्वाद देणारं**
**अडचणीत मार्ग दाखवणारं**
**कर्तृत्वाला दाद देणारं**
**यशाचं अभिनंदन करणारं**
**आणि आनंदात सहभागी होणारं....**

महाविद्यालयीन जीवनात.... आयुष्याच्या ऐन उमेदीत..... प्रत्येकाच्या मनी हा भाव उमटत असतो खरं ना.... हे वयच अल्लड, अवखळ, भिरभिरणाऱ्या फुलपाखरासारखं असतं. उत्साहानं भरलेलं, काहीतरी करून दाखवण्याची उर्मी मनी बाळगणारं. यावेळी आपलं कुणीतरी असावं असं हमखास वाटतं ना?

जिला आपल्या मनातील गुपीत सांगू इच्छितो, जिच्याबरोबर सुख, आनंदाचे क्षण साजरे करतो, जिच्यासोबत कॉलेजमधील धमाल मौजमजा करायची असते. प्रत्येक टप्प्यावर तिची साथ महत्वाची वाटते, जिच्यासाठी बेंचची जागा राखून ठेवावीशी वाटते. भाव-भावनांच्या या हिंदोळ्यावर झुलत असताना खरी एक मैत्रिण भेटते. प्रारंभी ना ओळख ना पाळख पण दोघींची ध्येयं एकच. त्या स्वार्थविरहीत मार्गावरून मित्रत्वाच्या प्रवासाला सुरवात होते. महाविद्यालयीन जीवनात शिक्षण घेत असतानाच मैत्रीचं एक हळूवार जग अस्तित्वात येतं.

खरं सांगायचं तर 'मैत्री' एक अजब रसायन आहे. ते ज्याला चांगल्या पध्दतीने जपता येतं त्यालाच मैत्रीचं समृध्द जीवन जगता येतं. मैत्री कशी असावी? मित्र कसा असावा? याला कोणतीही व्याख्या किंवा मर्यादीत चौकट नाही. जितक्या व्यक्ती तितक्या प्रवृत्ती व व्यक्तीनुसार मैत्रीची व्याख्या बदलते. जिथं जात, धर्म, भेद, पैसा, वय आड येत नाही.

निरपेक्ष मनाने आणि प्रामाणिकपणाने केलेली मैत्री दीर्घकाळ टिकून राहते. अशा मैत्रीसाठी एक कविता सांगावीशी वाटते.

**'जिथं वयाची बंधनं नसतात**
**गरीब - श्रीमंतीचा भेद नसतो**
**मात्र आपुलकीचा ओलावा**
**प्रेमाचा निरंतर झरा वहात असतो**
**तिथं मैत्री नावाची कस्तुरी असते.'**

मैत्रीमध्ये केवळ प्रामाणिकपणा, प्रेम, त्याग, समर्पण, विश्वास, आपुलकी असली तर ती मैत्री श्रेष्ठ म्हणता येणार नाही. त्यामध्ये विश्वास, समर्पण इतकाच चुकीच्या वाटेने जाणाऱ्या आपल्या मित्राला खडसवणारा आणि त्याला योग्य मार्गावर आणणारा मित्र कितीतरी श्रेष्ठ होय.

**'सुखात जरी नसलो तरी**
**दुःखात तुझ्या जवळ राहीन**
**उजेडात नसलो तरी**
**अंधारात तेवत राहीन'**

असा भाव मनी बाळगून अडचणीतील मित्राला मदतीचा हात देणाऱ्या मित्राची आज कमतरता नाही. त्यांच्याबरोबर

घालायचं असेल तर आपणही मनानं मोठं असायला हवं.

मात्र हल्ली या पवित्र नात्याचा गैरफायदा घेणारीसुध्दा मंडळी आहेत. अशा मित्रापासून चार हात लांब रहायला हवं. कॉलेज जीवनात बरोबरी करणारे खूप भेटतील पण कमतरता असते ती बरोबर चालणाऱ्यांची, साथ देणाऱ्यांची.

या बदलत्या वातावरणात मित्र- मैत्रिणींनो मैत्रीच्या नात्याकडे संकुचित नजरेने पाहू नका. महाविद्यालयीन जीवन हा आयुष्य घडविणारा कालखंड आहे. तेथे व्यक्तीमत्व विकासाचे चौफेर धुमारे फुटणारे आहेत. मित्र-मैत्रिणींनो कॉलेज जीवन कडू- गोड अनुभव येणारच. एकमेकांच्यात चुरस, ईर्षा असा... मात्र त्यात गुरफटून राहू नका.

मैत्रिच्या भावविश्वात स्वतः फुलताना इतरांचेही आ... फुलविण्याला तुमचा हातभार लावा. तरच तुमची 'मैत्री' ... टिकणार एवढे खरे.....

# महाराष्ट्र : स्पर्धा परीक्षांत मागे का?

विकास चौगु...

बी. ए. भाग ...

भारतातील महाराष्ट्र राज्य हे शैक्षणिक सामाजिक, आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या पुढारलेले असताना स्पर्धा परीक्षेत अपेक्षित प्रमाणात यशस्वी होत नाही. वस्तूतः समृध्द महाराष्ट्रातील जास्तीत जास्त विद्यार्थी यशस्वी होणे अपेक्षित आहे. आतापर्यंतचा इतिहास पाहिला असता असे लक्षात येते, की उत्तर व दक्षिण भारतातील राज्ये महाराष्ट्राच्या अनेक पटीने पुढे आहेत. २००५-०६ या वर्षाचे उदाहरण घेतले तर असे लक्षात येते की, तामीळनाडू या राज्यातून २० विद्यार्थी आय. ए. एस. परीक्षेत उत्तीर्ण झाले. त्याचबरोबर राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार, पंजाब, हरियाणा ही राज्ये सुध्दा महाराष्ट्राच्या खूपच पुढे आहेत. गेल्या वर्षी महाराष्ट्रातून ९०पैकी फक्त सहाच विद्यार्थी या परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यातून जास्तीत जास्त विद्यार्थी आय. ए. एस. परीक्षेत पास होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. २००६-०७ या वर्षात महाराष्ट्रातून बऱ्यापैकी विद्यार्थी या परीक्षेत पास झाले. कोल्हापूर जिल्ह्यातील एक विद्यार्थी मदन नागरगोजे हा गेल्याच परीक्षेत आय. ए. एस. उत्तीर्ण झाला आहे. आनंदाची गोष्ट म्हणजे आपल्याच भागातील के. एच. महाविद्यालय गारगोटी येथील क्रिडा शिक्षक प्राध्यापक नागरगोजे यांचे ते सुपुत्र होत. अब्दुललाट सारख्या खेडेगावातील व जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणारे ज्ञानेश्वर मुळे हे कोल्हापूर जिल्ह्यातील पहिले आय. ए. एस. परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी आहेत. महाराष्ट्राला सामाजिक सुधारणेचा व शैक्षणिक चळवळीचा वारसा लाभलेला असताना महाराष्ट्र आय. ए. एस. परीक्षेत मागे का? त्याची मिमांसा आपल्याला पुढीलप्रमाणे करता येईल.

१) जागरूकतेचा अभाव – महाराष्ट्रात विशेषतः ग्रामीण भागामध्ये आय. ए. एसच्या परीक्षेविषयी जागरूकता झालेली नाही असे दिसून येते. या परीक्षेविषयी जागरूकता निर्माण करण्याचे प्रयत्नही झालेले दिसत नाहीत. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात शिक्षणाचे काय ध्येय आहे हेच अद्याप स्पष्ट नाही. विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यावे हे अपेक्षित असते. परंतु आपल्या ध्येयाविषयी अनभिज्ञता असते. शिक्षण झाल्यावर काहीतरी नोकरी हवी अशी अपेक्षा गृहीत धरली जाते. ज्या काही मोजक्या विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता असते अशा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांमध्ये डॉक्टर किंवा इंजिनिअर होण्याचे ध्येय निर्माण होते किंवा केले जाते. डॉक्टर किंवा इंजिनिअर होण्यामध्ये काही गैर नाही पण शासकीय सेवेमध्येसुध्दा चांगले करीअर होऊ शकते याविषयी कधी विचारच केलेला नसतो.

२) विद्यार्थ्यांमधील न्यूनगंड – सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये न्यूनगंड असतो. आपण

मागासलेल्या व ग्रामीण भागातील असल्यामुळे आपल्यामध्ये शहरातील नामांकीत संस्थांमधून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांशी स्पर्धा करण्याची कुवत नाही अशी समजूत असते. पण यामध्ये तथ्य नाही. ग्रामीण भागातून आलेले व जिल्हा परिषदेच्या शाळेतून शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आय. ए. एस. झालेले आहेत. उदा. ज्ञानेश्वर मुळे हे देखिल जि. प. च्या शाळेतून शिक्षण घेतलेले आहेत.

३) योग्य मार्गदर्शनाचा अभाव – महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाचा अभाव प्रकर्षाने जाणवतो. अर्थात अभावाची पोकळी भरून काढण्यासाठी समाजातील उच्च शिक्षित व्यक्तीने, शिक्षकांनी, पालकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर कोल्हापूर, पुणे, मुंबई या ठिकाणी असलेल्या अनेक स्पर्धा परीक्षेच्या केंद्राचे मार्गदर्शन उपयुक्त ठरेल.

महाराष्ट्रात प्रशासकीय सेवेशिवाय इतर अनेक मार्ग उपलब्ध असूनही त्याविषयी जास्त विचार होत नाही. राज्यात वैद्यकीय, औद्योगिक क्षेत्र, सॉफ्टवेअर कंपन्या व इतर मार्ग उपलब्ध असल्यामुळे डॉक्टर्स, इंजिनिअर्स या क्षेत्राकडे वळतात. तसेच पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी बी. एड्. करून किंवा पदव्युत्तर शिक्षण घेऊन शिक्षक किंवा व्याख्याता बनण्याचा प्रयत्न करतात. काही निवडक विद्यार्थी राज्य लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून (एम. पी. एस. सी.) राज्यसेवेत जातात. अशा प्रकारे मुळातच आय. ए. एस.च्या परीक्षेस बसण्याचे प्रमाण कमी असते.

राज्य लोकसेवा आयोगाची परीक्षा देणारा विद्यार्थी 'आय. ए. एस.'च्या दृष्टीने क्वचितच विचार करतो. याचे मुख्य कारण म्हणजे राज्य व केंद्राच्या अभ्यासक्रमामध्ये व स्वरूपामध्ये भिन्नता जाणवते. मात्र इतर राज्यामध्ये दोन्ही परीक्षेचा अभ्यासक्रम सारखाच असतो. त्याचा बऱ्याच अंशी त्या विद्यार्थ्यांना फायदा होतो. परंतु अभ्यासक्रम सारखा जरी नसला तरी त्याचा फायदा निश्चितच होऊ शकतो. एम. पी. एस. सी.चा अभ्यास करतानाच 'आय. ए. एस.'च्या परीक्षेत पास झालेले अनेक विद्यार्थी आपणास पहावयास मिळतात.

४) नियोजन व व्यूहरचनेचा अभाव – नियोजन व व्यूहरचनेचा अभाव असतानाही बरेच विद्यार्थी मागील काही वर्षात 'आय. ए. एस.'साठी प्रयत्न करताना दिसतात. परंतु महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण कमीच आहे. याचे मुख्य कारण मेहनतीची कमतरता नव्हे परंतु नियोजनबध्द अभ्यासाचा अभाव होय. महाराष्ट्रातील विद्यार्थी खूप मेहनत घेतात. परंतु ही मेहनत ढोर मेहनत असते. स्पर्धा परीक्षेला ढोर मेहनत नव्हे तर योजनाबध्द अभ्यासाला व व्यूहरचनेला जास्त महत्व असते. येथेच महाराष्ट्रातील विद्यार्थी मागे पडतात. महाराष्ट्रामध्ये बहुतांशी महाविद्यालयामध्ये परीक्षेची उत्तरे कशी लिहावीत याविषयी कधीही अभ्यास अथवा चर्चा होत नाही. पण विद्यार्थी शक्य असेल तेवढी माहिती मिळवून भर देतात. स्पर्धा परीक्षेतसुध्दा हाच दृष्टिकोन ठेवल्यास यश मिळत नाही. हे बदलणे गरजेचे आहे.

५) पालकांचा कमकुवतपणा – आय. ए. एस.च्या परीक्षेची तयारी करण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांचा पाठिंबा असणे खूप महत्त्वाचे आहे. पाठिंबा फक्त आर्थिकदृष्ट्या नव्हे तर सामाजिक व मानसिकदृष्ट्या तेवढाच महत्त्वाचा असतो. तसेच आपला पाल्य ताबडतोब यशस्वी होईल याचा अट्टाहास धरणे चुकीचे आहे. कारण ही स्पर्धा परीक्षा आहे. आपल्या पाल्यांना थोडावेळ (किमान २ ते ३ वर्षे ) देणे आवश्यक आहे. यामध्येदेखील राज्यातील पालक कमी पडताना दिसतात.

महाराष्ट्रातील विद्यार्थी व पालक 'आय. ए. एस.' व इतर करीअर्स परीपूरक (Complementry) न समजता विरूध्द समजतात हा गैरसमज आहे. आपण डॉक्टर्स, इंजिनिअर्स, प्राध्यापकसारखे अध्ययन करूनही 'आय. ए. एस.' होऊ शकतो. या सर्व शाखांचा 'आय. ए. एस.'च्या परीक्षेमध्ये उपयोग होतो. महाराष्ट्रातील सर्व विद्यार्थ्यांनी खूप मेहनत करण्याची तयारी, जिद्द, चिकाटी व आत्मविश्वासाच्या जोरावर 'आय. ए. एस.' विरूध्द इतर करीअर्स असा विचार न करता 'आय. ए. एस.' व इतर करीअर्स असा विचार केल्यास त्यांना नक्कीच यश मिळेल मग चला आपल्याला 'आय. ए. एस.' व्हायचे आहे तर लागू अभ्यासाला. सर्वांना शुभेच्छा !

●●●

# आळस हा मोठा रोग

कु. सुरेखा भोईट
बी. ए. भाग

आज जगात विविध प्रकारचे रोग थैमान घालत आहेत. जगाची लोकसंख्या जशी वाढत जात आहे तसतसे रोगही वाढत आहेत. मलेरीया, विषमज्वर, पटकी हे जुने रोग. आता डेंगू, कर्करोग, एडस् असे नवीन रोग. या रोगांनी त्रस्त झालेले काय कमी लोक आहेत का? या रोगावर मात करण्यासाठी नवनवीन औषधांचाही शोध लागतो आहे. पण वैज्ञानिकांना आळस या रोगावर अजूनही रामबाण औषध सापडलेले नाही.

आळस हा माणसाचा सर्वात मोठा शत्रू आहे. तो विकासाच्या मार्गातला सर्वात मोठा अडथळा आहे. ज्या माणसाला आळस जडला त्या माणसाचा पूर्ण विनाश होतोच. पण त्यांच्या संपर्कात, त्याच्यावर अवलंबून असलेल्यांचाही तो विकास अडवतो नी विनाश घडवतो. म्हणूनच

**'आलस्य रोगची बहू तयाचा ।**
**प्रभाव आहे अती तीव्रतेचा ।**
**हा सर्व शक्तीस हरून नेतो ।**
**मनुष्य याने अती दीन होतो ॥**

आळसामुळे आलेले भाग्यही पाठ फिरवते. सर्वत्र आपला अपमान होतो. मनुष्याला दीनपणे, केविलवाणे जीवन जगावे लागते. त्यात कसला आला पुरुषार्थ? जो सतत उद्योग करतो, कामात स्वतःला गुंतवून घेतो, तो तर स्वतःची प्रगती करतोच पण आपल्या बरोबरच्याचीही प्रगती करतो. सतत उद्योग नि श्रम यामुळे टळतो अनर्थ. वेळ न दवडल्यामुळे धनही येते. धनप्राप्तीमुळे सौख्य – समाधानही लाभते. आळसामुळे नाही मिळत 'अर्थ' मग होतो सारा 'अनर्थ'.

म्हणूनच आपल्या आयुष्यात प्रगतीचा, आनंदाचा नि यशाचा वसंत फुलायला हवा असे वाटत असेल तर आळसाला जवळ करून भागणार नाही, दूर ठेवणेच योग्य आहे. दीर्घोद्योग हाच पुरुषार्थ हे विसरून चालणार नाही.

●●●

# 'शेवटचा तो शेतकरी' : असं का?

प्रमोद श्रीपती पाटील
बी. ए. भाग २

महात्मा फुले यांनी १८८३ मध्ये 'शेतकऱ्याचा आसूड' हा तत्कालीन शेतकऱ्यांच्या दयनीय स्थितीवर ग्रंथ लिहिला होता आणि आज स्वातंत्र्यानंतरच्या ६०व्या वर्षातील त्याच शेतकऱ्याचे वारसदार असणारे बहुसंख्य शेतकरी, मुठभर राजकारणी, कारखानदार व रक्षणकर्ते पोलिस यांच्या आसूडाने (चाबूकाने) आतून व बाहेरून सोलून निघत आहेत. अक्षरशः काही ठिकाणी फोडून काढलं जात आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानल्या गेलेल्या शेतकऱ्यांवर लोकशाहीतील सहकाराची अशी कटू फळे मिळायला लागल्यावर का त्यांचं पित्त खवळू नये? का त्यानं हातात उसाचं खोडवं घेऊ नये? अहो, सृष्टीचा नियमच आहे, दम असलेली एखादी वस्तू खाली दाबली असता कधी ना कधी वर उफाळून येणारच !

जोडधंदा म्हणून दुय्यम स्थान दिलेल्या दूध धंद्याकडे शेतकरी आशेने पाहू लागला होता. पण त्याच दुधाच्या माफक दरासाठी त्याला हे 'अमृत' रस्त्यांवर ओतण्याची वेळ आली! उसाची कांडं कारखान्याला 'रद्दीच्या' दरानं घालण्याची वेळ आणलीय

...णारी आणि थोडकं की काय म्हणून ठरलेला करार पाळला नाही (१२८०रु. भा) हे अप्रत्यक्षपणे झालेल्या जखमेवर ...मीठ चिरडून टाकलं ! शासनाला नमतं घ्यायला लावण्याकरीता, ...मागण्या मान्य करण्यासाठी शेतकऱ्याला लोकशाहीत ही डोकी ...फोडून घ्यायला लागतात. मग प्रश्न पडतो, ही लोकशाही की ...ठोकशाही? शेतातला माल अडत्याशिवाय खपत नाही. शेतकऱ्याच्या असहाय्यतेवर अडते, व्यापारी दलाल आपली पोळी ...त्याच्या सव्वा दरानं भाजून घेत आहेत. अशा परिस्थितीत भारताचा विकास दर २०,०००चा टप्पा ओलांडणाऱ्या ...निर्देशांकावर मोजायचा की दयनीय शेतकऱ्याच्या असहाय्यतेच्या ...पायावर?

शेतकऱ्यांच्या पोरांनो, राजकारणी, कारखानदार, अडते, व्यापारी आज कुणालाही लाजत नाहीत ! त्या सर्वांच्या संघटना, दले, पार्ट्या, पक्ष, एकी इ. ७० टक्के इतका शेतकरी वर्ग असणाऱ्या देशात 'शेतकरी संघटनेला' फिकी पाडत आहेत. शेतकऱ्याची एकी हे घटक हाणून पाडत आहेत. ही परिस्थिती बदलायची असेल तर सत्तर टक्के शेतकरी असणाऱ्या या देशातील प्रत्येक शेतकरी पहिल्यांदा आतून बाहेरून बदलायला हवा. सुज्ञ म्हणण्याइतपत त्याला शहाणा, समंजस, जाणकार केला पाहिजे. अज्ञान, अज्ञान आणि अज्ञानच हे शेतकऱ्याची पिळवणूक करणाऱ्यांचे खरे भांडवल आहे. राजकारण्यांच्या, सत्ताधाऱ्यांच्या प्रत्येक बोलण्यावर, कृतीवर शेतकऱ्याला दूरदृष्टी आली पाहिजे. त्याशिवाय प्रत्येक शेतकऱ्यात असणारी राजकीय नेत्यांची, पुढाऱ्यांची खुशामत, पाठराखण, जय बोलो किधर भी चलो म्हणण्याची वृत्ती गाडली पाहिजे. त्यानेच शेतकरी सत्तेसमोर मिंधा ठरतो आहे. स्वाभिमान विकला जातो आहे. आपला स्वाभिमान जपणे हाच एकमेव उपाय आजघडीला उपलब्ध आहे आणि हे घडले तरच पुढील योग्य गोष्टी आपसूकच होतातच. महात्मा फुले यांनी १९व्या शतकातील पारतंत्र्यांतील शेतकऱ्यांना सांगितलेला आसूड (चाबूक) हा आपल्याच अंगावर मारून क्लेश करण्याकरता नाही. तर तो तुमच्या पिळवणूक कर्त्यांना फोडून काढण्यांकरीता वापरला पाहिजे.

ऊसी ऊसादराचा व दूध दराचा प्रश्न टोकाच्या भूमिकेकडे जाऊ पहात असतानाच शासनाची तटस्थता, कारखानदारांचा पळपुटेपणा तर समस्त उत्पादक शेतकऱ्यांची व्याकुळता व आक्रमकता प्रकर्षाने समोर येत आहे. शासनाच्या व साखरसम्राटांच्या या भूमिकेमुळे परस्परांतील विश्वासार्हता कमी होत आहे. गेल्या वर्षाच्या गळीतास करारानुसार ठरलेला ऊसाचा आश्वासक दर देण्यास एखादं दुसरा अपवाद सोडल्यास सर्वच कारखान्यांना अपयश आले आहे. अशा परिस्थितीत चालू गळीत हंगामात सुरुवातीस बहुतांशी कारखानदारांनी दर जाहीर करण्याचं धारीष्ठ दाखवलं नाही. अर्थातच ज्या ठिकाणी आश्वासक संभाव्य दर जाहीर करण्याचे धाडस कारखानदार करू शकत नाहीत. जिथे शासन ऊसाला 'हमी भाव' देईल अशी कल्पनाही अशक्य वाटते. दुसऱ्या बाजूला दूध दराचा प्रश्न जोर धरत असताना मुख्यमंत्र्यांची टोलवाटोलवीची उत्तरे शासनाची वरवरची भूमिका स्पष्ट करते. जिल्हा दूध संघाच्या निवडणूकीत दूधसम्राटांची सामान्य दूध उत्पादकाला खीजगणतीतही न धरता 'लाख'मोलाच्या ठरावावर लक्ष केंद्रीत करते. उलटपक्षी प्रत्येक जिल्ह्याचे संघ दूध दराच्या मुद्यापेक्षा 'ठरावाचा' दर ठरविण्यात वर्षानुवर्षे 'प्रगतीपथावर' आहे.

अशा परिस्थितीत शेतकऱ्यांचा उद्रेक उफाळून न येईल तरच नवल ! ही आंदोलने, होणारा विध्वंस रोखायचा असेल तर शेतकऱ्याला पहिल्यांदा विश्वासात घेऊन कारखानदार दूधसंघ व शासन यांनी आपापल्या पातळीवर उघड व स्पष्ट कारभार करणे गरजेचे आहे. दोघांच्यातील सहसंबंध वाढेल असे विश्वासार्ह धोरण आवश्यक आहे. मोठ्या प्रमाणातील भ्रष्टचार हाच या आंदोलनामागील कारणीभूत घटक ठरतो आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये. शेतकरी व व्यवस्था यांच्यातील विश्वास वाढला तरच शेतकरीसुध्दा आत्मविश्वासाने कामाला लागेल आणि भारतीय अर्थव्यवस्था अधिक बळकट होईल.

●●●

# जात, वर्ग आणि परिवर्तनाचा लढा

कृष्णात पाटील
बी. ए. भाग २

इंग्लंडसारख्या देशातील मुठभर लोकांनी व्यापाराच्या निमित्ताने हिंदुस्थानात येऊन कोट्यावधी लोकसंख्येच्या या बलाढ्य देशावर (आजचा भारत, पाकिस्तान व बांगला देश) दीडशे वर्ष राज्य केले. याचे महत्वाचे कारण म्हणजे इथे असलेली विषमता. मग ती धार्मिक, सामाजिक किंवा आर्थिक असो इंग्रजांनी इथे राज्य करण्यापूर्वी देश किंवा राष्ट्र म्हणून अस्तित्वातच नव्हता. आज जे काही पाक, भारत ही राष्ट्रे अस्तित्वात आहेत ती ब्रिटीशांनी स्वतःच्या राज्यकारभारासाठी केलेल्या व्यवस्थेमुळेच होय.

आजही आपल्या भारतात विषमतेचे गंभीर स्वरूप प्रखरतेने जाणवते. हिंदूमधील जातीव्यवस्थेचा विचार करायचा झाल्यास हजारो जाती व त्यांच्या पोटजाती या धर्मामध्ये असलेल्या पहायला मिळतात. असे अनेक धर्म भारतात आहेत. प्रत्येक धर्मातील जाती वेगळ्या. यांच्यातील उच्च निचतेचे प्रकार आजही सुरळीतपणे अस्तित्वात आहेत. प्रत्येक जात आपली स्वतंत्र संस्कृती, नीतीनियम जपत आहेत ही झाली सामाजीक विषमता. अशीच विषमता आर्थिक क्षेत्रातही आहे. यामध्ये गरीब व श्रीमंत हे दोन वर्ग. यातील गरीब हा अत्यंत गरीब होतो. तर श्रीमंत अतिश्रीमंत होतो. ही विषमता अशीच वाढते. स्त्री व पुरूष या वर्गातील विषमताही आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून साठ वर्षे होऊनही महिलांसाठी ३३ टक्केसुध्दा आरक्षण मिळत नाही ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. स्त्री आणि पुरूष ही मानवाचीच रूपे आहेत मग दोघांनाही समान अधिकार का नाहीत?

जगातील सर्व मानव जात ही एकच आहे. असे असताना सर्वांचा एकच धर्म (मानवता) का असू शकत नाही? प्रत्येकाचा धर्म वेगळा, जात वेगळी, संस्कृती वेगळी. संस्कृतीचा विचार केल्यास हवामान, भौगोलिक परिस्थिती यानुसार विविधता असू शकते. पण धर्मासाठी, जातीसाठी किती दिवस भांडत राहणार हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. जन्माला येणाऱ्या प्रत्येकाला जगण्याचा समान अधिकार आहे. परंतु आपल्या शक्तीची गुणवत्ता, पात्रता व श्रेष्ठता ही त्याची जात, धर्म, लिंग यावरूनच ठरते. आजही खैरलांजीसारख्या घटना घडून जातीयतेचा कलंक अधिकच दृढ होतो. मग अशा विषयांचे राजकारण करून संधीसाधू आपले हित साधतात.

या सर्व विषमतेच्या भिंती फोडून आपला भारत खऱ्या अर्थाने बलशाली महासत्ता बनवायचा असेल तर माणसाने माणसाशी माणसासारखे वागायला हवे. थोडक्यात मानवतानाही दृष्टीकोनातून विचार करायला हवा. हे परिवर्तन घडविण्यासाठी सर्वसामान्य जनतेनेच सर्व भेद विसरून तीव्र लढा उभारण्याची गरज आहे. हे शक्य झाल्यास जात, वर्ग आणि परिवर्तनाचा लढा यशस्वी झाला असे अभिमानाने सांगता येईल.

●●●

## प्रेम.....

प्रेम हा शब्द ऐकताच हृदयातून जणू आनंदाचा स्फोटच होतो. प्रेम हे एक अडीच अक्षरी अतूट, प्रेमळ बंधन आहे. प्रत्येक मनुष्याच्या मनात कोठेना कोठे प्रेमाने वास्तव केलेलेच असते. काहीजण ते उघडपणे करून दाखवतात. तर काही मनुष्य धाडस करण्यास घाबरतात. प्रेम हे काही पाप नाही. माझ्यामते आयुष्यात एकदातरी प्रेम करून पाहिले पाहिजे. प्रेमामुळे दोन जीव एकत्र येतात. प्रेम म्हणजे चांदण्यासारखं शुभ्र व सूर्यासारखं तेजस्व आणि गुलाबासारखं प्रेमळ असते. 'Modern Love' हे काही प्रेम नव्हे तर नुसता दिखावा आहे. प्रेम करा पण प्रेमाचा अपमान करू नका. प्रेम करा पण ते निभवायला शिका, निभवायला शिका......

कु. प्रियांका पांडुरंग पाटील
बी. ए. भाग २

# अमेरिकेची कुटनीती

रविंद्र आनंदा पाटील
बी. ए. भाग २

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी आपणास अशी आशा दाखवली आहे की, २०२० साली भारत महासत्ता बनवायचा असेल तर आपण सर्व भारतीयांनी मिळून त्यासाठी प्रयत्न करायला हवा. आज जगाचा विचार केल्यास अमेरिका ही सर्वात मोठी महासत्ता आहे. अमेरिकेने आपल्या आर्थिक व तंत्रज्ञानाच्या सामर्थ्यावर संपूर्ण जगावरती वर्चस्व ठेवले आहे. तसेच भविष्यात आपल्या जगावरचा प्रभाव असाच असावा यासाठी प्रयत्न करत आहेत.

आजपर्यंतच्या इतिहासामध्ये अमेरिकेने आपल्या भूमीवरती एकही युध्द खेळले नाही. दोन्ही महायुध्दांमध्ये त्यांना कोणत्याही प्रकारचे आर्थिक नुकसान झाले नाही. दुसऱ्या महायुध्दानंतर कोणत्याही देशामध्ये संपूर्ण जगाची सत्ता आपल्या हातामध्ये घेण्याची ताकद नव्हती त्यावेळी अमेरिका हा एकमेव देश असा होता ज्याने जगाचे नेतृत्व करावयाचे ठरवले. मात्र सोव्हिएत रशिया व अमेरिका यांचे काही वर्षे शीतयुध्द झाले. मात्र रशियाने माघार घेतली. तेव्हापासून अमेरिकेच्या हातामध्ये जगाचे नेतृत्व गेले. चीन, भारत, जपान, रशिया यासारखे देश महासत्ता बनण्याच्यादृष्टीने पावले टाकत आहेत. परंतु अमेरिका त्यांच्यापासून खूप पुढे गेलेली आहे. अमेरिकेने आपले वर्चस्व राखण्यासाठी साम, दाम, दंड, भेद या सर्व मार्गांचा वापर केला. इराक व इराणमधून काही प्रमाणात विरोध होताच अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज बुश यांनी त्यांच्यावर लष्करी कारवाई केली. इराकचा हुकूमशहा सद्दाम हुसेन यांना फाशी देण्यात आली. यावरूनच अमेरिकेची पावले ओळखता येतात.

भविष्यामध्ये आपणास कोणी विरोध करू नये म्हणून त्यांनी आत्तापासूनच मोठ- मोठी शस्त्रे तयार करण्यावर भर दिला आहे. त्यांनी जगातील सर्वात मोठा अणुबॉंब (Mother of all bombs) तयार केला. विकसनशील देशांना आर्थिक सहाय्य करून त्यांना आपल्या अधिपत्याखाली ठेवले जात आहे. वेगवेगळे कायदे व करार करून इतर देशांच्यावर बंधने आणण्यात येत आहेत. उपलब्ध असलेल्या संपत्तीवर ते आपले जीवनमान खूप वर्षे टिकवू शकतात. अमेरिकेच्या अशा नीतीमुळे अनेक देश त्याच्या अधिपत्याखाली आहेत तर काही अप्रत्यक्षरित्या त्यांना विरोध करतात.

२००८ या सालामध्ये प्रवेश करताच काही हुकूमशाही राष्ट्रांनी लोकशाहीचा पुरस्कार केला. यावरून जगाला शांतता हवी आहे असे वाटत असले तरी खरी परिस्थिती वेगळीच आहे. रशिया, चीन, जपान यासारखी राष्ट्रे अप्रत्यक्षरित्या अमेरिकेस विरोध करतात. रशियाने यांच्या 'मदर ऑफ ऑल बॉम्ब'पेक्षा चारपटीने मोठा 'फादर ऑफ ऑल बॉम्ब' तयार केला आहे. यावरून त्याच्यामध्ये असणारी शस्त्रास्त्र व अणुचाचण्या स्पर्धा पाहिली असता तिसरे महायुध्द होण्याची दाट शक्यता मानली जात आहे. चीनही महासत्ता होण्यासाठी अमेरिकेच्या चुरशीने सुधारणा करत आहे. या सर्वांच्यामध्ये 'युनो' आंतरराष्ट्रीय संघटनेची भूमिका महत्वाची आहे. या संघटनेचे वर्चस्व जोपर्यंत जगावरती आहे तोपर्यंत तिसरे महायुध्द दूर आहे. अन्यथा जगाचा विनाश अटळ आहे.

●●●

## जीवनाचे मूलमंत्र

१) जगायचे आणि इतरांना जगायला शिकवायचे ही जीवनाची सरळ प्रेरणा आहे.

२) आपल्या प्रत्येकाचे जीवन हे अनमोल आहे त्याची तुलना कधीही मृत्यूशी करू नये.

३) झोपलेल्या सिंहाच्या तोंडांत श्वापदे काही आपोआप येऊन पडत नाहीत ती त्याला मारूनच मिळतात. कारण आळसाने काही मिळत नसते.

४) आपण कोणतेही कार्य करत असताना जणू ते अखेरचं आहे अशा भावनेने पार पाडा.

५) जीवनात दुःखाची दरी ओलांडल्याशिवाय सुखाची पर्वतावरील हिरवळ कशी दिसणार?

६) जो स्वाभीमानी व पराक्रमी असतो तो कधीही देवाची उपासना करत बसत नाही.

७) जीवनात सत्य हे लाकडी ठोकळ्यासारखे असते कितीही व केव्हाही आत ढकलले तरी ते लगेच वर येऊन तरंगू लागते.

८) जीवनातल्या खाचखळग्यातल्या वाटेने जाताना तुमच्या जवळ शिक्षण, प्रयत्न आणि विश्वास या तीन गोष्टींची आवश्यकता असते.

९) जीवनातील तीन महत्वाच्या व्यक्ती - एक जिने आपल्याला पृथ्वी दाखवली ती आई. दुसरे पुज्य वडील आणि तिसरी प्रिय मित्र. यांना कधीही विसरू नये.

१०) जीवन जगणे ही एक तडजोड आहे. कधी सुखाशी, कधी दुःखाशी खेळण्याची. कारण पत्यांच्या खेळात मनासारखी पाने मिळाली नाहीत म्हणून कोणी डाव उधळून टाकतो का?

**सुशांत जयवंत पाटील**

बी. एस्सी. भाग १

## प्रेमा तुझा रंग कसा?

प्रेम म्हणजे ती, प्रेम म्हणजे ईश्वर, प्रेम म्हणजे सर्वस्व, प्रेम म्हणजे त्याग, प्रेम म्हणजे विश्वास, प्रेम म्हणजे धोका, प्रेम म्हणजे डोक्याला ताप.

प्रत्येकजण स्वतःच्या अनुभवातून प्रेमाची व्याख्या करत असतो आणि काळानुसार बदलत राहतो. या समाजारुपी जगामध्ये प्रत्येकाने कोणावर तरी प्रेम केलं असेलच.... ज्याप्रमाणे मीही केलं. प्रेमात पडण्यासाठी वेळेचे किंवा वयाचे त्याचप्रमाणे काळाचे बंधन नसते. दोघांच्या 'फ्रिक्वेन्सिज' मॅच झाल्या, दोघांचीही ओळख झाली, सहवास वाढला की आपोआपच एकमेकांवरील प्रेम वाढत जाऊन त्याच्यासाठी अधिकाधिक वेळ बाजूला काढून ठेवला जातो. प्रेम हे एक असं नातं आहे की, त्यामध्ये जात, पात, रूढी, परंपरा, धर्म, उच्च - नीच असा भेदभाव मुळात नसतो. कारण प्रेम हे कुणाचं कुणावरही बसतं. त्याचप्रमाणे प्रेमामध्ये स्वीकार करणाऱ्याने व व्यक्त करणाऱ्याने नीट विचार करूनच प्रेमाच्या डोहात पाऊल टाकलं पाहिजे.

प्रेम हे प्राजक्ताच्या फुलासारखे असावे. पौर्णिमेच्या शीतल चांदण्यासारखे असावे. प्रेमामध्ये चांगली भावना असावी. प्रेमाचं नातं अतूट होण्यासाठी आपण कोणत्याही मनावर बळजबरी करू नये. प्रेमाच्या आधारासाठी दोघांच्याही मनातील भावना एक असावी लागते.

**संदीप शिवाजी फराकटे**

बी. ए. भाग ३

## तारुण्याच्या वाटेवर....

प्रत्येकाने आयुष्यात एकदातरी प्रेम करून पहावे. प्रेमाची अद्‌भूत जादू काय असते हे नक्कीच जाणून घ्यावं, प्रेमात एकदातरी वर्षेच्या मयुरासारखं बहरावं. संपूर्ण पिसारा फुलवून धुंद होऊन नाचावं. खळखळून हसावं. विरहात भरभरून रहावं. पण....

प्रत्येकानं आयुष्यात एकदा तरी प्रेम करून पहावं ! प्रेमात एकदातरी कडक उन्हात चालून पहावं. मुसळधार पावसातही

भिजून पहावं, तहानभूक, वेळकाळ याचं भान विसरून जगावं ! पण..... प्रत्येकाने आयुष्यात एकदातरी प्रेम करून पहावं. वादळ वाऱ्यातही हातात हात धरून पुढे जात रहावं. वेदनांना उराशी कवटाळून उत्साहाने जगावं. प्रेमाचं नातं स्नेहाच्या, विश्वासाच्या धाग्यांनी घडवावं. पण..... प्रत्येकानं आयुष्यात एकदातरी प्रेम करून पहावं ! जर तरूण रहायचं असेल तर प्रेम करत रहावं. नाहीतर चिरायु होऊनही कणकण मरत रहावं. पण..... प्रत्येकानं आयुष्यात एकदातरी प्रेम करून पहावं ! पण..... नुसतंच प्रेम करून पाहू नये तर शेवटपर्यंत प्रेम निभावायलाही शिकावं, प्रेम निभावायलाही शिकावं......

**सचिन अरूण खाडे**

बी. एस्सी. भाग २

---

## मसालेदार पत्र

प्रिय जायफळ भाऊ व दालचिनी ताई,

नारळ दादांचा नमस्कार वि. वि.

आता पत्र लिहिण्यास कारण की, बदामकाका यांना आनंदाची बातमी म्हणजे जीरे यांची सुकन्या शहाजीरे हिचे लग्न मिरे यांचे सुपुत्र लवंगकुमार यांच्याशी ठरले आहे.

मिरचीला शाळेत घातले आहे व मोहरी अजून लहान आहे. तसेच मनुका आजारी आहे. शेजारचे डॉ. बडिशेपकाका व खसखस यांच्याकडे उपचारासाठी गेले आहेत.

सकाळी साखरदादा व त्यांची पत्नी चहापूड यांचे कडाक्याचे भांडण झाले. त्यामुळे दोघांनीही उकळत्या पाण्यात उडी मारली. तसेच बटाटेकाका विळीवर उडी मारून मरण पावले. त्यांचा कांदेराव हा कोपऱ्यात बसून रडत आहे.

आता काही लिहीत नाही. कडीपत्ता व कोथिंबीर यांना नमस्कार व तीळ हिला गोड गोड पापा.

कळावे

आपला नारळदादा

पत्ता :

खलबत्ता मिक्सर बेपत्ता

मु. पो. - पलिकडे

ता. - आमच्याकडे

जि. - तुमच्याकडे

फो. नं. - फिरवील तिकडे

**संदीप खंडू पाटील**

बी. ए. भाग ३

---

## सांजवेळ होताच येते तुझी आठवण !

मन आतूर व्हायचं फक्त तुझ्याच भेटीसाठी. तू पण चातकाप्रमाणे माझी वाट पहात बसायचीस. तुझ्या ओठांवरचं स्मित हास्य पाहिलं की दिवसभराचा थकवा क्षणात निघून जायचा. खरंच तुझ्यात मी इतका हरवलोय की मला शोधायचं म्हंटलं तर मला तूच दिसतेस. तुझ्या सहवासातील प्रत्येक क्षण, आयुष्य जगण्यासाठी आठवणींचं रोपटं माझ्या मनात लावून गेलं.

तुझ्या आयुष्यभराची साथ मिळावी अशी इच्छा होती. पण... पण स्वप्नांना हक्क नसतो ना सत्यात उतरण्याचा. आता तुझ्याशिवाय जगणे अगदी असह्य झालंय गं. प्रत्येकाच्या जीवनात प्रेमाचं वादळ येत असतं. कोणी भरकटत असतं. कोणी टिकत असतं. वाळूच्या किल्ल्यासारखे मी किल्ले बांधत गेलो. तेवढ्यात भरतीची लाट उचंबळली आणि क्षणात कल्पनेचे किल्ले तुडवून उद्ध्वस्त करून गेली आणि राहिल्या फक्त पाऊलखुणा.....

तुझ्याशिवाय जगणं क्षणाचही नसावं गं. तुझ्यापासून दूर नेणारं मरण तुझ्या कुशीत असावं. किती वेळ सावरण्याचा प्रयत्न करतो मी माझ्या मनाला. पण काही केलं तरी अश्रू आपोआपच गळायला लागतात. आयुष्यात न विसरण्यासारखी तुझी आठवण. हीच माझ्या जीवनातील सर्वात मोठी साठवण. सागराच्या प्रवाहाला किनाऱ्याची आस असते. पण माझ्या आयुष्याला किनारा कधीच मिळणार नाही. स्वप्नांच्या या दुनियेत आठवणीशिवाय काहीच करत नाही गं... काहीच नाही

**तुळशिराम शिवाजी बोडके**

बी. ए. भाग १

## चारोळ्या

हल्ली प्रेम करण्यासाठी
स्मार्ट दिसावं लागतं
मनापेक्षा शरीरालाच
फार जपाव लागतं

एकतर्फी प्रेमातून
खूप काही घडतं
जिवंत माणसालाही
मेल्याचं स्वप्न पडतं

नकोत आता अंध भावना
हवे कशाला भोंदू बाबा
विज्ञानाच्या प्रगत युगावर
अजून आहे त्यांचा ताबा

कधी ना कधी देवालाही
जागेची चिंता वाटू लागेल
भारतातील मंत्र्यांची जेव्हा
नरकात गर्दी दाटू लागेल

**श्रीकांत मारुती फराकटे**
बी. एस्सी. भाग १

## चारोळ्या

१) आला आला रुकवत
त्यावर होता चंदनाचा पाट
चंदनाच्या पाटावरती होते सोन्याचे ताट
सोन्याच्या ताटात होती चांदीची वाटी
चांदीच्या वाटीत होता रेशमाचा रुमाल
रेशमाच्या रुमालात होता मोगऱ्याचा गजरा
तुम्हा सर्व स्पंदन वाचकांना मानाचा मुजरा

२) डफावरती थाप तुणतुण्याला ताण
राष्ट्रीय सेवा योजना हाच आमचा प्राण

३) तू कॉलेजमध्ये आल्यावर
मला विधानसभेवर आल्यासारखं वाटतंय
तू माझ्याकडे बघून हसल्यावर
मला बिनविरोध आमदार झाल्यासारखं वाटतंय

**तानाजी मारुती हातकर**
बी. ए. भाग ३

## प्रिय

प्रिय..., माझे हृदय
सोपवलं तुझ्या हाती
पण हे कायमचं दुःख
सतत चिकटून राहीलं
माझ्या माथी
हे प्रिये काही नाही
केलं मी तुझ्यासाठी
पण तू काय अर्पण
केलंस माझ्यासाठी?
डोळ्याला डोळा भिडला
तसा जीव प्रेमात पडला
जीवनात येऊन हा पहिलाच
गुन्हा मला नडला
तुझ्यासाठी मी जीवाचं रान केलं
तू दुसऱ्याला जवळ करून मला परक केलं
का.... छळतेस
तू सारखी मुला?
खरंच मी गुन्हा केला
असेल तर शिक्षा कर मला?
आयुष्यात येऊन
दुनियेत सर्व काही शिकवलं
पण प्रेमात पडू नकोस.
हे नाही शिकवलं
म्हणून प्रिये म्हणतो
माझे हृदय सोपवलं तुझ्या हाती
पण हे कायमचं दुःख सतत
चिकटून राहील माझ्या माथी

**रणजीत अंगज**
बी. ए. भाग ३

## नवं वर्ष

किती महान संस्कृती
अशीच भारताची ख्याती
पण आपण स्विकारतोय
पाश्चात्य संस्कृती
........पण ..........
असाच एक दिवस येतो
पाश्चात्याचे अनुकरण करतो
गत स्मृतीची गुंफण करतो
सुखी क्षणांची उधळण करतो
सारे जीवन फुलवून जातो
सरत्या वर्षाला निरोप देता
असाच एक दिवस येतो
आनंदाचे क्षण घेऊन येतो
जुन्या स्मृतीला उजाळा मिळतो
नव वर्षाचा अर्थ कळून चुकतो
नवी उमीदे नवी आशा
नवा उत्साह नवी स्वप्ने
सुख दुःखाच्या सोबत
चैतन्याचं नवं कारंज पेरून जातो
प्रत्येकाच्या मनात नववर्षाच स्वप्न असतं
स्वप्न म्हणजे विश्रांतीचं घरटं असतं
घरट्यातच माणूसकीचं रोपटं असतं
माणसाशी माणसाप्रमाणं वागण्यातच
जीवनाचं सार्थक असतं
नष्ट करूया ही विकृती
आपणच आपल्या शस्त्रानी
अन् जोपासूया महान हिंदू संस्कृती

**दयानंद दत्तात्रय हुजरे**
बी. ए. भाग ३

## अनामिका

ती एका क्षितीजाप्रमाणे आहे
तिला एकटक पहाण्याचा प्रयत्न करतोय
ती एक मृगजळ आहे
तिच्या मागे धावण्याचा प्रयत्न मी करतोय
ती एक पाण्यातील बुडबुडा आहे
तिला स्पर्श करण्याचा प्रयत्न करतोय
ती एक किरणाचा कवडसा आहे
तिला वश करण्याचा प्रयत्न करतोय
ती एक बंदिनी आहे
तिला मोकळीक देण्याचा प्रयत्न करतोय
ती एक मोहिनी आहे
तिला प्राप्त करण्याचा प्रयत्न मी करतोय
ती एक अनामिक आहे
तिला नाव देण्याचा प्रयत्न मी करतोय
तिची साथ, सहवास मिळेल अशी आशा करतोय

दयानंद पाटील
बी. ए. भाग २

## Modern पसायदान

आता परीक्षा देवे । माझीया उत्तरे तोषावे ॥
तोषिनी मज द्यावे । क्लिअर पास ॥
पेपर फुटीची मिळाली संधी । त्यामुळे मिळाला अवधी ॥
उत्तराची करुन तयारी । आधी गेलो केंद्रावरी ॥
त्यात कॉपी मिळाली । आनंदाची भरती आली
लिहून उत्तरे सगळी । टाकला पेपर ॥
परिक्षकांची व्यंकटी सांडो । उत्तरे गुणप्रमाण पडो ॥
जो जी श्रेणी तो ती लाहो । विद्यार्थीजण ॥
होती परिक्षकांची निती । आणि सहकार्य गुरुचे हाती ॥
राहो ऐसी गुरु शिष्य युती । अखंडीत ॥

सदाशीव पाटील
बी. ए. भाग ३

## प्रीत

प्रीतीच्या भोवऱ्यात अशीच
वणवण असते
आघातावर आघात नेहमीच
घणघण असतात
घणघणण्याचे आवाज तेवढे
येत नसतात
आघाताचे घाव मात्र सारखे
बसत असतात
प्रत्येक घावानिशी हृदय
उलत असते
आठवणीचे काटे सतत
सलत असतात
सलणारे काटे खोल खोल
रुतून बसतात
क्रूर मुद्रा करुन वाईट
हास्य करतात
हसण्यात त्यांच्या अनेक
उपहास असतात
'करशील प्रीत पुन्हा?'
असे बजावत असतात

सुयोग कोतमिरे
बी. ए. भाग ३

## असे नाही........

हसण्यात नेहमी हर्ष
असतोच असे नाही
रडण्यात नेहमी दुःख
असतेच असे नाही
रुसण्यात नेहमी राग
असतोच असे नाही
आठवणींमध्ये नेहमी विरंगुळा

असतोच असे नाही
निरोपामध्ये नेहमी अश्रू
असतातच असे नाही
एकांतात नेहमी एकटेपणा
असतोच असे नाही
जगण्याला या आपल्या नेहमी अर्थ
असतोच असे नाही
पण म्हणून जीवन जगायचेच नाही
असेही काही नाही

कु. पल्लवी पाटील
बी. ए. भाग २

## गरज

फुलाला गरज असते
सुहासाची
पानाला गरज असते
वाऱ्याची
रंगाला गरज असते
निसर्गाची
मुलाला गरज असते
मायेची
शिष्याला गरज असते
गुरूची
ज्ञानाला गरज असते
विकासाची
डोळ्यांना गरज असते
स्वप्नांची
हृदयाला गरज असते
आठवणीची
मनाला गरज असते
प्रेमाची
मैत्रीला गरज असते
बंधनाची
नात्याला गरज असते
विश्वासाची
आपल्याला गरज असते
आपल्याची
आणि त्यांच्या प्रेमाची

कु. पूनम पोवार
बी. ए. भाग २

## मैत्रिण

एक तरी मैत्रिण अशी हवी
जरी न बघता पुढे गेलो
तर मागून आवाज देणारी
आपल्यासाठी हसणारी
वेळ आली तर अश्रू पुसणारी
स्वतःच्या घासातला घास
आठवणीने काढून ठेवणारी
वेळप्रसंगी वेड्या मित्राची
प्रेमानं समजूत काढणारी
यशाच्या शिखरावर
पाठ थोपटणारी
वाकडं पाऊल पडताना
मात्र मुस्कटात मारणारी
सगळ्यांच्या घोळक्यात
आपणास सैरभैर शोधणारी
आपल्या आठवणीत
आपण नसताना व्याकूळ होणारी
खरंच ! एकतरी मैत्रिण हवी
आपणास मित्र म्हणणारी

पवन पांडुरंग चौगले
बी. ए. भाग ३

एक नजर

एक नजर सखे तुझी
खूप काही सांगून गेली
प्रीतीच्या या प्रेम पाशात
अलगत मला गुंतवून गेलीस

एक नजर सखे तुझी
स्वप्नात मला भेटून गेली
स्वप्नाच्या या भावविश्वात
नकळत मला अडकून गेली

एक नजर सखे तुझी
खूप काही सांगून गेली
हृदयातील भावनांना
हळूच अशी स्पर्शुन गेली

अमित फराकटे
बी. एस्सी. भाग १

**प्रभाव मालिकांचा**

डोळे हे फिल्मी गडे
रोखून टिव्हीकडे पाहू नका
मालिकांची मालिका ही
सातत्याने पाहू नका

रोज उठून मालिकांची
चिंता तुम्ही करू नका
या आमच्या गोजिरवाण्या घरात
चार दिवस सासूचे
सातत्याने म्हणू नका

रोज उठून तिच तिच रडगाणी
पुन्हा पुन्हा पाहू नका
आणि ते पाहण्यासाठी दहा वाजेपर्यंत
उपाशी आम्हाला ठेवू नका

मार्क कमी पडले म्हणून
मुलांच्यावर तुम्ही ओरडू नका
मालिका पाहण्याकरीता
मुलांच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष तुम्ही करू नका

मालिकांचा प्रभाव तुम्ही
दैनंदिन जीवनावर पाडू नका
अन्यथा, मुलं मुली बिघडली म्हणून
आमच्या नावाने ओरडू नका

संग्राम किल्लेद
बी. ए. भाग

**''जाता जाता तू विसरू नको''**

भल्याभल्याचा बळी घेतला
व्यसनाधीन होऊ नको ।
माणसाचा जन्म मिळाला
माणुसकीला विसरू नको ।
नारीपोटी जन्म घेऊनी
नारीला तू विकू नको ।
आपले जीवन आपल्यासाठी
भोगविलासी रमू नको ।
शिकणे नाही ज्ञान वेचणे
ध्येयाला तू सोडू नको ।
श्रीमंताचा बेटा असशील
गर्वाने तू फुगू नको ।
अपयशाची फिकीर नाही
कॉपी केव्हा तू करू नको ।
सन्मार्गाने सदा चालणे
अविचाराने वागू नको।
नसेल धन तर करू नको सण
कर्जबाजारी होऊ नको ।

भलेपणाने जीवन जगणे
ध्येयापासून ढळू नको ।
तिळातिळाने दुसऱ्यासाठी
देह झिजविण्या विसरू नको ।
देह मिळाला सोन्यासारखा
गटारामध्ये लोळू नको ।
टिचभर खळगी भरण्यासाठी
इमानदारीला सोडू नको ।
विकास होतो विशालतेने
गोष्ट मोलाची विसरू नको ।

जोतिराम रामचंद्र फराकटे
बी. ए. भाग २

## आमची शान

केदारलिंग श्री जोतिबा,
शिवरायांचा इथे पन्हाळा,
हिरवे हिरवे ऊस मळे अन्
दूध-साखर.तूप मिळे,
धन-धान्याची समृध्दी,
सहकाराची चळवळ इथे,
दूध-साखर शिक्षण समुहाची,
शैक्षणिक पंढरी वसे,
जमिनीवरती स्वर्ग जिथे,
बिद्री मौनीनगर नाव तिचे,
दूधसाखर महाविद्यालय एक हिरा,
कला-शास्त्र शिक्षणाचा महा तारा,
वारस ताऱ्याचे आम्ही,
पाईक भारत भू चे आम्ही,
हीच आमची आन असे,
हीच आमची शान असे,

राज नलवडे
बी. एस्सी. भाग २

## सौंदर्य

हरिणीसारखे डोळे तुझे
नेत्रांजन लावत जा
मोत्यासारखे दात तुझे
Close- up ने घासत जा
सुवर्णक्रांतीचे अंग तुझे
साबणाने कोणत्या धुशील?
संतूर, लक्स, रेक्सोना की
कॅमे वापरशील
नाजूक नाजूक कंबर तुझी
जर कधी लचकलीच तर
आयोडेक्स वापरत जा
थंडीमुळे ओठ फुटलेच तर
Vaseline वापरत जा
पाय जप भेगापासून
लखानी वापरत जा
भेगा पडल्याच जर कधी
CRACK CREAM लावून पाहा
लांब काळ्याभोर केसाचं सौंदर्य
SUN-SILK च वाढवेल
पांढरेच जर झालेच केस
GODREJ-HAIR-DIE च वाचवेल
पण प्रिये,
हे क्षणभंगूर खरंच का महत्त्वाचं?
मन जर नसेल सुंदर,
तर शरीर काय कामाचं
जगात प्रत्येक जण जाताना
हेच जपलेलं शरीर घेऊन जातो
पण मनाचा मोठेपणा जाणलेला
आठवणीचा गंध ठेवून जातो

नवनाथ ज्ञानदेव पाटील
बी. ए. भाग ३

## प्रेम कसं करायचं

सांग प्रिये प्रेम कसं करायचं?
आम्ही तुमच्यामागून फिरायचं
तुम्ही मात्र वळूनसुध्दा नाही पाहायचं
आम्ही तुमच्या दारावरून फिरायचं
आम्हाला पाहून तुम्ही घरात पळायचं
आम्ही तुम्हाला 'I Love You' म्हणायचं
पण तुम्ही दखलसुध्दा नाही घ्यायची
आम्ही तुमच्यासाठी झुरून मरायचं
तुम्ही मात्र मजेत जगायचं
मग सांग प्रिये प्रेम कसं करायचं
आम्ही तुमच्याकडे पाहायचं
पण डोळ्यातलं स्वप्न डोळ्यातचं राहायचं
सांग प्रिये प्रेम कसं करायचं?
तुम्ही आम्हाला सोडून जायचं
आम्ही दुःखात डुंबायचं
पण तुम्ही मात्र आनंदात बोहल्यावर चढायचं
मग सांग प्रिये प्रेम कसं करायचं?

प्रसाद खोत
बी. ए. भाग ३

## प्रेम

प्रेमासारख्या फालतू विषयात
आम्ही कधी पडलो नाही
आम्ही समजतो पडणाऱ्यासारखे
आम्ही कधी घडलो नाही
होकार मिळेल की नाही
यात कधी वेळ घालवला नाही
म्हणूनच मनातला 'ग्रीन सिग्नल'
कधी मालवला नाही
एकीसाठी गाडी कधी अडली नाही
पण मनात वाटतं?
यार माझ्यासाठी कोण कशी घडली नाही?
वेळ आल्यावर निश्चितच ती दिसेल
आणि तिच्यासह मी ही प्रेमात फसेन
मी ही प्रेमात फसेन

अमोल आ. गुर
बी. ए. भाग ३

## नशा

दारू एक असते नशा
प्यायल्यावर सापडत नाही दिशा
दारूची चव काय असते
न पिणाऱ्याला माहीत नसते
पहिली मज्जा म्हणून घेतो
सुरवात टोपणाने करतो
मग, टोपण फेकून बाटली तोंडाला लावतो
डोक्यात गेल्यावर काढतोय आय-माय
गटारीत पडतंय वर करून दोन पाय
पडण्यासाठी रस्ता आमच्याच बापाचा हाय
अंगात शिरल्यावर दाखवते इंगा
घरात आल्यावर करतंय दंगा
बायका पोरं पसरतात भोंगा
ओसरी असावी घराच्या बाजूला
बायकोनं लाथ मारली की झोपायला
प्यायल्याने माणसाचा होतो दानव
माणसाचा राहीत नाही मानव
साधी पितो

इंग्लीश बोलतो
I am sorry
Don't worry
बायकोपेक्षा पारी बरी
पिऊन शेवटी मरतो
राखंवरसुध्दा बाटली ठेवा म्हणतो
तेव्हा कुठे 'निवद' शिवतो

बळीराम पंडे
बी. ए. भाग २

## कुणाला काय कळलेच नाही.....

तुझ्यावर प्रेम करता करता
आयुष्य असंच निघून गेलं
आयुष्यात खूप काही करायचं होतं
पण करायचं राहून गेलं.....
पुन्हा तुला कॉलेजमध्ये पाहिले,
मंगळसूत्र गळ्यात पाहिले
माझेच मला बुडताना
मी पाण्यात पाहिले
तुझ्यासाठी गुंफत होतो प्रेमाचा धागा
पण वास्तविकरित्या कळल्यावर मी जागा झालो....
तेव्हा मला कळले
जीवन हे एक गणित आहे
विवाह ही एक गणती आहे
प्रेम हे त्याची वजाबाकी आहे
आयुष्य हा त्याचा भागाकार आहे
अखेर मृत्यू हेच त्याचे उत्तर आहे.....

रणजीत खोत
बी. ए. भाग १

## जीवनाच्या वाटेवर

जीवनाच्या आशेवर जीवन घडवायचे असते
जीवनात कधीही घाबरायचे नसते
संकटांना सामोरे जायचे असते
दिव्याप्रमाणे जळत राहायचे असते
जीवनात नेहमी हसायचे असते
स्वतःला हसता-हसता
रडणाऱ्यालादेखील हसवायचे असते...
मान सन्मान नाही मिळाला म्हणून
कधीही नाराज व्हायचे नसते
वाईट कोणीही बोलले तरी
मनावर मात्र घ्यायचे नसते
दुःखात रडत राहण्यापेक्षा
आनंदी जीवन जगायचे असते
म्हणून जीवन अखेरचं असतं
एक दिवस सर्वांनाच जायचं असतं
म्हणूनच मरणाला कधी घाबरायचे नसते

दत्तात्रय फराकटे
बी. ए. भाग १

## मृत्यूला हाक

''आजच्या तरूण पिढीचा
व्यसन झाला आहे छंद
म्हणूनच त्यांचे दीर्घायुष्य
होत आहे मंद,
सळसळते तरूण रक्त
चांगल्या गोष्टीत रमत नाही
चार घोट टाकल्याशिवाय
त्यांना काही काम जमत नाही,

चांगले खाणं सोडून
चघळत आहे गुटखा
तोंड पाहिल्यावर वाटतं
जणू मोजतोय शेवटच्या घटका
टपरीवर उभा राहून
नाकातोंडातून धूर सोडत आहे
जीवनाला दूर लोटून
मृत्यूला जवळ ओढत आहे
म्हणूनच हक्क नाही व्यसनाधीन पिढीला
समृध्द भारत रंगवायचा
ज्याच्यासमोर मृत्यू उभा आहे
तो काय भारत देशाला जगवायचा
म्हणूनच आता आपण सर्वजण
फक्त एकच निर्णय घेऊ
या व्यसनरूपी मृत्यूच्या राक्षसाला
आपल्यापासून दूर ठेवू''

**कु. पूनम भि. गोते**
बी. एस्सी. भाग १

## शब्दांना शब्दांचा आधार

वेलीला आधार असतो
म्हणून ती फुलत असते
उमलणाऱ्या फुलाला सुगंध असतो
म्हणून देठालाही महत्त्व असते
भविष्याची स्वप्नं पाहिली नाहीत
ते डोळ्याचे पहाणं व्यर्थ आहे
दुःख वेदना ज्यात नाहीत
ते जगणंच अर्थहीन आहे
दुःखाचे डोंगर ओलांडताना
हसतच संकटाशी झगडावं
मृत्यूशी भेट होताना
प्रेमानं त्याला अलिंगन द्यावं
गुलाबाला पहारा देताना
काटे खरं इमान राखतात
सुगंधाऐवजी गुलाबच घेताना
हलकेच वेदनेचा दंश करतात

**कु. स्वप्नाली केरबा मांडवकर**
बी. ए. भाग १

## आयुष्य संपत आलं की......

आयुष्य संपत आलं की
जास्तच जगावसं वाटतं
जसं वातीतील तेल संपताच
ज्योत प्रखर पेटून विझते तसं
कधी दिसलं नसलेलं
सौंदर्य चराचरात जाणवतं
अंधारात राहिलेलं मन
चैतन्याच्या प्रकाशात न्हातं
सागर किनारी वाळूचं
मन घरटं बांधू लागतं
येणाऱ्या प्रचंड लाटेला
ताकदीने अडवू लागतं
पिसारा फुलवून नाचणं
शेवटच्या क्षणी जमू लागतं
जेव्हा एकही पीस पिसाऱ्यात
शिल्लक राहणार नसतं
दिवस कसे अलगद जातात
जसं तरंगणं ढगाचं
मोल वाढत जातं
इथल्या प्रत्येक क्षणाचं

**कु. स्मिता संजय जिरगे**
बी. ए. भाग २

## वेड मन

बुध्दीला जाणीव असते वास्तवाची
नसते ती वेड्या मनाला
वेड होऊन उधानलेलं बेभान मन
स्वप्नावर तरंगत
चांदण्यावर फुलत
आशेवर झुलत अमाप भरकटत
कधी कधी नसते जाणीव त्याला
कटू वास्तवाची
झुगारून सत्य
स्वप्न कुरवाळताना
फसव्या अभासांना
अन् गडद गहिऱ्या दुःखाचा
महापूर अनाहूत होतो
अशा चकवा घेतल्या वळणावर
हतबल होऊन ते भिरभिरते
आता इथे उद्ध्वस्त होताना
सावरावयास कोण असते?

**विजय तानाजी चांदणे**
बी. ए. भाग १

## कोणासाठी ?

नयनांनी पापण्यातून पाहावं
चोरून त्या चांदण्यासाठी
चांदण्या आकाशात येतात
त्या शीतल चंद्रासाठी
चंद्र आहे रात्रीसाठी
रात्र आहे स्वप्नांसाठी
सूर्य आहे दिवसासाठी
दिवस आहेत आठवणीसाठी
पाऊस येतो धरतीसाठी
धरती खुलते वेलीसाठी
वेलीने बहरावे कळीसाठी
कळीने उमलावे फुलासाठी
फुलांनी फुलावे आपल्यासाठी
आपण जगावे एकमेकांसाठी

**रोहन राजेंद्र डोणे**
बी. ए. भाग १

## स्त्री भ्रूण हत्या

नको नको गं आई माझा असा अंत करू
का? तर मी स्त्रीत्वाच्या जन्माला आले म्हणून
काय मी असे पाप केले
हे जग पाहण्याआधी तू मला नेले?
माझे अस्तित्व बहाल कर मजला
हेच सांगणे आई आता तुजला
खरंच या सुंदर जगात यायचे आहे
हे जग डोळे भरून पाहायचे आहे
मान-सन्मानाने जगायचे आहे
कोणीतरी मोठे होऊन दाखवायचे आहे
तुझ्या एका योग्य निर्णयावरून
अस्तित्व माझे जाईल बहरून
ऐकशील ना गं माझे हे इवलेसे बोल
तरच तुझ्या वर्तनाचे विधाता करेल योग्य मोल

**कु. राजश्री आनंदा पाटील**
बी. ए. भाग ३

### ''बदललेल्या वाटेवर''

तू गेल्यावर
बदललेल्या वाटेवर
तुझी आठवण म्हणून
मी जगतो आहे
निराशेचा सूर आहे
काळोखाची साथ आहे
दिशा बदलली तरी
अजून मी चालतो आहे
विरहाची आग आहे
वेदनेचा भार आहे
स्वप्नांचा आधार आहे
म्हणून मी जगतो आहे
कधीतरी येशील म्हणून
मी पुन्हा फुलतो आहे
तू गेल्यावरही
बदललेल्या वाटेवर
तुझी आठवण
माझे गाणे आहे

उत्तम आनंदा कळमकर
बी. ए. भाग ३

### ध्येय

जन्म दिला आई-वडिलांनी
लहानाचे मोठे केले त्यांनी
लाड, हट्ट पुरवले त्यांनी
शिक्षणावरती खर्च केला त्यांनी
माझ्याकडून खूप अपेक्षा केल्या त्यांनी
खूप स्वप्ने पाहिली त्यांनी
मी त्यांची स्वप्ने पूर्ण नाही केलीत
तरी ही ते रागावले नाहीत
पुढील शिक्षणासाठी दिला त्यांनी आधार
त्यांनी नाही घेतली माघार
त्यानी दिलेल्या प्रेरणेचा, संधीचा उपयोग करून
खूप खूप अभ्यास करून
त्यांची व माझी स्वप्ने पूर्ण करणे
हेच आहे माझे ध्येय

कु. वर्षा पाटील
बी. ए. भाग ३

### जीवनगाणे

ठेच लागली म्हणून आता
पुढे चालणे थांबू नये
भातुकलीचा खेळ मांडल्यावर
मध्येच डाव मोडू नये
दुःख मागे लागले म्हणून
सुखाची आशा सोडू नये
आशा-निराशेच्या चक्रात
स्वतःचे अस्तित्वच विसरू नये
दगडासारखं कणखर बनावं
मेणासारखं वितळू नये
चंदनासारखं जीवन जगावं
सोन्या-चांदीप्रमाणे झिजू नये

कु. सुप्रिया पाटील
बी. ए. भाग २

### प्रतीक्षा

कविता असली माझी जरी
'शब्द' सारे तुझेच आहेत
सूर असला माझा जरी
'गीत' मात्र तुझेच आहेत
हृदय असलं माझं जरी
'स्पंद' सारे तुझेच आहेत
श्वास असला माझा जरी
'गंध' मात्र तुझाच आहे
सरते ओंजळ माझी जरी
'आठवणी' मात्र तुझ्याच आहेत
गेलीस निघून कायमची जरी
'प्रतीक्षा' फक्त तुझीच आहे

सागर चव्हाण
बी. ए. भाग १

### काय माझा गुन्हा

सोड हा बहाणा, उभा का अबोला
काय झाला माझा गुन्हा-गुन्हा
सागर तीरी सायंकाळी
अवचित आलीस माझ्यासमोरी
तशीच राहिलीस मग येत पुन्हा-पुन्हा
वसंत फुलला, आला बहर
तशी पुलकीत झालीस
मी ही अनिवार
सरता सरेना, दिवस सारा सुना-सुना
घडले सारे मनासारखे
मिलन झाले दोन मनाचे
सरिता सागरापरी
नियतीचा हा नियम असे ठेव जपूनी खुणा-खुणा
काय झाला माझा गुन्हा-गुन्हा

सचिन राणे बी. ए. भाग १

### असं असतं कॉलेज

कुणी म्हंटलं कॉलेज म्हणजे
स्वप्नांची नगरी
आम्ही वारकरी तर
कॉलेज आमची पंढरी
कुणी म्हंटलं कॉलेज म्हणजे
भविष्याची वळणे
कुणाच्या चेहऱ्याकडे पाहून
कुणीतरी जळते
कुणी म्हणे, कॉलेज म्हणजे
प्रेमाचा अविष्कार
इथूनच मिळते प्रेरणा
कुणाचा तरी आधार
खरंच स्पर्धा असते इथे
डोळ्यामध्ये पाहण्याची
आवाज भेसूर असूनही
इच्छा होते गाण्याची
त्या व्यक्तीच्या नजरेसाठी
दिवसभर तडफत राहणे
रात्री तर आहेच पण
दिवसाही स्वप्न पाहणं
कॉलेज म्हणजे नवी उमंग
परीक्षा खणखणाऱ्या नाण्यांची
कितीही मोठे लक्ष असो
पण जोड अथक प्रयत्नांची

विशाल मगदूम
बी. ए. भाग १

## मला ही वाटते......

मला ही वाटते
कुणी माझे आपले असावे
दुःखाच्यावेळी साथ देणारे
मला ही वाटते
कुणी मला सांगावे
आपले मानून सल्ला मागणारे
मला ही वाटते
कुणी माझे असावे
संकटसमयी हातात-हात देणारे
मला ही वाटते
कुणी माझे असावे
माझ्यातच त्यांचे विश्व पाहणारे
मला ही वाटते......

**कु. शुभांगी पांडुरंग पोवार**
बी. ए. भाग ३

## धोका

हसण्यामध्ये मुर्ख ठरण्याचा धोका असतो
रडण्यामध्ये हळवं ठरण्याचा धोका असतो
भेटण्यामध्ये एकमेकात गुंतण्याचा धोका असतो
भावना व्यक्त करण्यात स्वतःचं खरं रूप प्रकट होण्याचा धोका असतो
लोकांसमोर तुमचे विचार तुमची स्वप्ने जाहीर करण्यात ते गमवण्याचा धोका असतो
प्रेम करण्यात, प्रतिसाद न मिळण्याचा धोका असतो
जगण्यात मरण्याचा धोका असतो
आशेत निराशेचा धोका असतो
प्रयत्न करण्यात अपयशाचा धोका असतो
पण धोके हे पत्करलेच पाहिजेत कारण कुठलाही धोका न पत्करणं हेच आयुष्यात सर्वात धोकादायक असतं

**गुरूनाथ नरहरी पाटील**
बी. ए. भाग ३

## आयुष्याचं गणित

तुझ्यावर प्रेम करता करता
आयुष्य असंच निघून गेलं
आयुष्यात खूप काही करायचं होतं
पण करायचं राहून गेलं
पुन्हा तुला गावात पाहिलं
मंगळसुत्र गळ्यात पाहिलं
माझेच मला बुडताना
मी पाण्यात पाहिलं
तुझ्यासाठी गुंफत होतो प्रेमाचा धागा
पण वास्तव कळल्यावर मी झालो जागा
तेव्हा मला कळले
जीवन हे एक गणित आहे
विवाह ही एक गणती आहे
प्रेम त्याची वजाबाकी आहे
आयुष्य हा त्याचा भागाकार आहे
अखेर मृत्यू हेच त्याचे उत्तर आहे

**मिलींद तानाजी पालकर**
बी. ए. भाग १

## विद्यार्थी नापास का होतात?

वर्षाचे एकूण दिवस ३६५
३५ दिवस दिवाळी आणि नाताळची सुट्टी
उरले ३३० दिवस

५० दिवस उन्हाळ्याच्या सुट्टीत जातात
उरले २८० दिवस
एका वर्षात एकूण ५२ रविवार असतात
उरले २१८ दिवस
विद्यार्थी ८ तास झोपतो
उरले १०८ दिवस
कपडे बदलणे, अंघोळ करणे, जेवणे यामध्ये
दररोज अडीच तास जातात म्हणजे ७३ दिवस
जातात
उरले ३५ दिवस
सणासाठी वर्षातून १५ दिवस सुट्टी
आता आहेत २० दिवस
१९ दिवस परीक्षा असते
उरला १ दिवस
तो दिवस निकालात जातो मग तुम्हीच सांगा
विद्यार्थी नापास होणार नाही तर काय होणार?

**शरद खोत**
बी. ए. भाग १

**साक्षरता**

जीवनाच्या रम्य बागेत
शब्दांच्या कोमल वेलीवर
अक्षरांच्या वेलीवर
फुलणारे फूल म्हणजे सावित्रीमाता
अज्ञानाच्या अंधारात
ज्ञानाच्या प्रकाशात
लोकांच्या अंतःकरणात
पेटणारी ज्योत म्हणजे क्रांतीबा
आकाशातून कोसळती धारा
वनातून वाहतो वारा
अशीच आहे ही एक धारा
साक्षरता हा त्याचा किनारा
जसे दूधसाखर महाविद्यालय बिद्री

**दिग्वीजयसिंह पाटील**
बी. ए. भाग ३

**धन्य ! ते छत्रपती शिवराय !**

रूप यौवना पाहूनी वदले
हीच आमुची माय
धन्य ते छत्रपती शिवराय....
भेटी आणली रूपसुंदरी
भयकंपित ती नजर बावरी
रूप पाहूनी थकीत झाले
हर्षभरे मानिली आपुली माय....
चोळीबांगडी सन्मानाने
परत पाठविले शिवप्रभूने
झुके आदरे सदैव माथा
गौरविली राजमंदिरी माय....
मायभगिनींची आसवे पुसूनी
स्वराज्याचा मंत्र जपूनी
निर्भय केली प्रजा सारी
धन्य जिजाऊ शिवप्रभू माय
धन्य ! ते छत्रपती शिवराय....

**साताप्पा रामचंद्र काशिद**
बी. ए. भाग ३

**प्रेम**

प्रेम म्हणजे एक रस्ता आहे
त्यावर चालत रहा
प्रेम म्हणजे एक संघर्ष
यामध्ये विजयी व्हा
प्रेम म्हणजे एक सौंदर्य
त्याची पुजा करा
प्रेम म्हणजे एक स्वप्न
याचा साक्षात अनुभव घ्या
प्रेम म्हणजे कर्तव्य
हे पूर्ण करा
प्रेम म्हणजे एक प्रवास
तो पूर्ण करा
प्रेम म्हणजे एक खेळ
त्यात मनसोक्त खेळा
प्रेम म्हणजे एक दुःख
त्यावर ताबा मिळवा
प्रेम म्हणजे एक गाणे
मनमुराद गा
प्रेम म्हणजे दुःखान्त आहे
त्याच्याशी झुंज द्या

**विशाल मुरलीधर घुंगरे-पाटील**
बी. एस्सी. भाग २

**पीक**

पांढऱ्या शुभ्र कवट्यांचा तो थोरला डोंगर
काळपुरुष मेलेली मढी उकरत बसलाय
आणि आदिम तृष्णा
एका शरीराकडून दुसऱ्या शरीराकडे धावत आहे
सिमेंटात घडलेल्या म्हणी
सिमेंटात घडविलेले वाक्प्रचार
रोज रोज भाषेचा खेळ तरी किती खेळायचा?
तू या आंधळ्या आरशाला बोलायला लावू नकोस
प्रत्येकाच्या हृदयात हलते आहे चतुरंग संवेदनेची डहाळी
खोल खाली त्वचेच्या मुळाशी
प्रत्येकाचीच जमीन जातेय नांगरली
यंदाच्या सालीही वेदनेचं पीक मायंदाळच येईल

**सागर आनंदराव मोरे**
बी. एस्सी. भाग २

**एकच आयुष्य असतं......**

एकच आयुष्य असतं....
हसण्यासाठी....
जगण्यासाठी....
खेळण्यासाठी....
बागडण्यासाठी....
रडण्यासाठी....
रूसण्यासाठी....
आपलं कोण? परकं कोण?
ओळखण्यासाठी....
एकच आयुष्य असतं....
सप्तरंगी इंद्रधनुष्य पहाण्यासाठी....
आकाशातील चंद्राचे सौंदर्य अनुभवण्यासाठी....
एकचं आयुष्य असतं....
पावसाची रिमझिम अनुभवण्यासाठी....
प्रेमरूपी पावसात
ओलेचिंब भिजण्यासाठी
एकच आयुष्य असतं....

ुसऱ्याला सुख देण्यासाठी....
खरं प्रेम करण्यासाठी
ओळखण्यासाठी....
दुःखातही आनंद मानण्यासाठी
एकच आयुष्य असतं......
एकमेकांवर रागावण्यासाठी.....
एकमेकांशी भांडण्यासाठी.....
भांडणे आणि राग विसरून
पुन्हा एक होण्यासाठी
एकच आयुष्य असतं....
आलेलं अपयश पचवण्यासाठी
आणि......
अपयशाच्या सर्व पायऱ्या चढून ओलांडून
मधुर यशाची चव चाखण्यासाठी.....

**दत्ता पाटील**
बी. ए. भाग १

## थोरांचे विचार......

१) जगात दुसऱ्याला हसवण्याइतके सोपे व रडवण्याइतके कठीण काम नाही – साने गुरुजी

२) पाणी वाहून गेल्यानंतर पाय न भिजवता पलिकडे जाऊ. या आशेवर न बसता प्रवाह तोडून पलिकडे चला. – स्वामी विवेकानंद

३) प्रेम डोळ्यांनी नव्हे तर हृदयाने पाहात असते असे म्हणतात – शेक्सपीअर

४) शिस्त व ज्ञान यांचा आपल्या जीवनाशी आंतरिक संबंध आहे याची जाणीव करून देणे म्हणजे खरे शिक्षण होय. – रविंद्रनाथ टागोर.

५) उच्चारावरून विद्वत्ता, आवाजावरून नम्रता व वर्तनावरून शील समजते. – स्वामी विवेकानंद

६) प्रेमाशिवाय सेवा व्यर्थ आहे. प्रेम नसताना कोणी सेवा करीत असेल तर तो व्यापार करीत आहे असे समजावे – आचार्य विनोबा भावे.

७) सत्य, नम्रता, स्वातंत्र्य यांचा मिलाफ आणि आचार, उच्चार, विचार यांचे उगमस्थान म्हणजे शिक्षण होय. – कर्मवीर भाऊराव पाटील.

**सुशांत पाटील**
बी. एस्सी. भाग १

## स्पंदन प्रकाशक व मालकीसंबंधी माहिती

| | | |
|---|---|---|
| प्रकाशन स्थळ | : | दूधसाखर महाविद्यालय<br>बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर - ४१६ २<br>फोन नं. ( ०२३२५ ) २५४८२२ |
| प्रकाशन काळ | : | वार्षिक |
| प्रकाशक व प्रमुख संपादक | : | प्राचार्य डॉ. आर. एल. राजगोळकर |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | दूधसाखर महाविद्यालय<br>बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर - ४१६ २०<br>फोन नं. ( ०२३२५ ) २५४८२२ |
| कार्यकारी संपादक | : | डॉ. एस. जी. गायकवाड |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | दूधसाखर महाविद्यालय<br>बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर - ४१६ २०<br>फोन नं. (०२३२५) २५४८२२ |
| मुद्रक | : | नवरंग ऑफसेट, कोल्हापूर |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | १५५१ -अ-ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर -४१<br>फोन नं. ( ०२३१ ) २६२५५०९ |
| टाईप सेटींग | : | दिशा - दर्शन<br>सौ. दिपाली दिलीप खोत<br>२३४८ सी, वॉर्ड, शनिवार पेठ, कोल्हापूर.<br>फोन नं. (०२३१) २५४७१४३ |

मी प्राचार्य डॉ. आर. एल. राजगोळकर असे जाहीर करतो की, वर दिलेली माहिती म
माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरी आहे.

– प्रकाशव

**मानव की है जाति एक ही,**
**अन्तजाति कहाँ है ?**
**रक्त मांस - मज्जा आकृति की,**
**समता एक यहाँ है ।**

चित्रकूट
रामेश्वर दयाल दुबे



# हिंदी विभाग

विभागीय संपादक
डॉ. एस. बी. देसाई

# अनुक्रमणिका

## गद्य विभाग


| | | |
|---|---|---|
| १) अध्यापक : कल आज और कल | भारती पावसकर | ३ |
| २) जिंदगी | मिलन मगदूम | ४ |
| ३) २१वी सदी की स्त्री | विद्या वास्के | ४ |
| ४) दो - स्वत | माधुरी वाघवेकर | ५ |
| ५) क्या होता है प्यार | प्रशांत बराडे | ६ |
| ६) पानी का पैसा पानी में | शारीका चौगले | ७ |
| ७) धर्म | स्मिता पाटील | ८ |
| ८) एक गलती | अर्चना चौगले | ९ |
| ९) वैश्वीकरण के दौर में कॅम्प्यूटर क्रांति और राजभाषा | उज्वला पोतदार | १० |


## पद्य विभाग


| | | |
|---|---|---|
| १) दोस्ती | रणजीत फराकटे | ८ |
| २) यह तो जीवन है | वर्षा वास्के | ११ |
| ३) चुटकुला | सुप्रिया कांबळे | ११ |
| ४) बेचैन दिल | उत्तम कलमकर | १२ |
| ५) काश | विद्या चौगले | १२ |
| ६) सैनिक | प्रविण चौगले | १२ |
| ७) थोडा जी के देखो | अश्विनी पाटील | १२ |
| ८) अनमोल वचन | शितल शेटे | १३ |
| ९) चार बातें | विद्या माने | १३ |
| १०) वह | महादेव फराकटे | १४ |
| ११) सलाम | संतोष फराकटे | १४ |
| १२) जिंदगी की सच्चाई | शिल्पा पाटील | १५ |
| १३) माँ | सयाजी पाटील | १५ |
| १४) तेरी याद | रोहन फुटाणकर | १५ |
| १५) सेल फोन और पत्नी | विजय कांबळे | १५ |
| १६) हिंदी बोलना हमारी Duty है | ऋषिकेश फुटाणकर | १६ |
| १७) चुटकुले | गणेश पाटोळ | १६ |

# "अध्यापक : कल, आज और कल"

कु. भारती पावराकर
बी. ए. भाग २

'पोथी पढी – पढी जग मुआ, पंडित भया न कोय
ढाई अच्छर प्रेम के, पढे सो पंडित होय ।'

संत कबीर के इस दोहे से स्पष्ट होता है, कि कितना भी विद्वान, पंडित ज्ञानी क्यो न हो, अगर उसके मुँह में प्रेम के दो शब्द भी नही है तो वह पंडित नही कहलाएगा।

अध्यापक दया, सहानुभूति, सहृदयता, प्रेम आदि गुणो से संपन्न, विनम्र एवं मृदुभाषी होना चाहिए। वह छात्रों के लिए सच्चा पथदर्शक एवं मित्र होना चाहिए। उसके पास चिकित्सक वृत्ति, अभिनय कौशल्य, अच्छा चरित्र, ज्ञान लालसा हो। अध्यापक की विशेषता के बारे में कवि कीटस् कहते है, 'वह सत्याधिष्ठित सौंदर्य और सौंदर्य और सौंदर्याधिष्ठीत सत्य के दर्शन छात्रों को मुक्त रूप से कराएँ।'

कल के अध्यापकों के बारे में कुछ कहना है तो पध्दति का जिक्र करना चाहिए। आज के छात्रों को शिक्षा देनी है, तो उन्हे विधालय में दाखिल करना पडता है। प्राचीन काल में प्रकृति की गोद में गुरू के पास विद्या प्राप्त करके छात्र शिक्षित होता था। इस शिक्षा पध्दति में छात्रों को भी विद्याओं का ज्ञान दिया जाता था। गलती करने पर कडी से कडी सजा दी जाती थी। जब वह सभी विद्याओं में निपुण हो जाता तब गुरू उसकी परिक्षा लेकर घर लौट जाने का आदेश देते थे। शिक्षित छात्र तेजोमय होता था। ज्ञान देनेवाले गुरू का सभी विद्याओं पर अधिकार था। इसलिए उसे "आचार्य" शब्द से विभूषित भी किया गया।

आधुनिक काल में शिक्षा में काफी बदलाव आ गया है। प्रकृति का स्थान बडे- बडे भवनों ने लिया। पुस्तकों के सहारे शिक्षा देना प्रारंभ हो गया। आज काल के छात्रों को अध्यापन अगर सजा देने का प्रयास करता, तो वह सजा 'बुमरँग' के रूप में उसी पर उलटने लगी है। आज छात्रों को सजा देने वाले कोई अध्यापकों को अपनी नौकरी पर पानी फेरना पड रहा है। छात्रों की उदासिनता के कारण आज के अध्यापक भले ही अपने विषय में कितने भी माहिर क्यो न हो, लेकिन छात्रो के सामने पढाते वक्त उन्हे थोडीसी दिलचस्पी नही होती।

आचार्य कुल कहते है, अध्यापक जहाँ भी अपने अध्यापन का कार्य कर रहे है, क्या वहाँ ये सुरक्षित है? क्या अध्यापक अपनी जिम्मेदारीयाँ भूल रहे है? या वे सिर्फ अर्थप्राप्ती का उद्देश रख कर कार्य करते है? या उसका जिम्मेदार वर्तमानकाल रहा है, पता नहीं। संत कबीरजी ने अपने सुंदर दोहे के माध्यम से कहाँ है,

"जाका गुरू अंधला। चेला निपट निरंध।।
अंधे अंधा ठेलिया। दोनो कूप पड़त।।"

अगर गुरू ज्ञान, बुध्दी, आचार–विचार से अंधा रहा तो शिष्य भी अंधा हो जाएगा। गुरू अंधा तो समाज भी अंधा। परिणामतः राष्ट्र का विनाश भी निश्चित ही होगा।

"न ही ज्ञानेन सदृश्यं पवित्रमिह विध्यते।"

जो भी हो अध्यापन का पवित्र कार्य अध्यापकही करेंगे। तकनीकी शिक्षा हो या प्राथमिक शिक्षा अध्यापकों को सिर्फ पुस्तकी कीडे नही बनना है। सामाजिक धरातल पर छात्रों को शिक्षा देना बहुतही अनिवार्य है। क्यों कि आज संगणक का युग है। दूरदर्शन का चैनल भी पाठ का माध्यम बन जाएगा और भविष्य में छात्रोंको अध्यापकोंके शरण में जाना ही होगा।

●●●

# जिंदगी

कु. मिलन मगदूम
बी. ए. भाग २

जिंदगी तो एक जुआ है, कभी हारना है तो कभी जितना है, बस कोशिश करते रहना है, जिंदगी में एक पल सुख का होता है, तो हजारो पल दुःखों के होते है। दुःखों का पहाड होता है। जिंदगी में हर किसकी छोटी मोटी गलतियाँ होती है। जैसे हम अपने गलतियों को क्षमा करते है, वैसे हमे दुसरों के गुलतियों को भी क्षमा करना चाहिए। जिंदगी में कुछ लोग अपने दिल की बात जुबान से कह देते है। लेकिन जो कुछ कहती भी नही, उसकी आँखो से समझ लेना चाहिए। जिंदगी में कुछ लोग ऐसे मिलते है, जिनके जुबान पर कुछ होता है, तो दिल में कुछ और होता है।

जिंदगी में काम के लोग चन्द मिलते है। कौन अपना और कौन पराया यह आज तक कोई नही समझ सका। जिंदगी में हमें आगे बढना है, तो दुःख में भी हँसना चाहिए। सुख में सभी शामील होते है। पर दुःख में भी कोई किसका साथ नही देता तब अपने भी परायें हो जाते है।

जिंदगी में दिन की शरूआत भगवान का नाम लेकर ही होनी चाहिए। वह दिन हमारे लिए अच्छा हो वा बुरा हो हमें दिन की शुरूआत भगवान का नाम लेकर करनी चाहिए। जब हमपर मुसीबत आती है। तो हम आँखे बंद करके सच्चे दिल से अपने भगवान का नाम लेते है और भगवान सच्चे भक्तोंकी मनोकामना पुरी करते है उनकी मुसीबत दूर करते है।

ये है हमारे जिंदगी की दाँस्ता।

●●●

# २१वी सदी की स्त्री

विद्या रघुनाथ वारके
बी. ए. भाग ३

''पिता रक्षति कौमर्ये,
भर्ता रक्षति यौवने
रक्षति स्थविरे पुत्रः,
न स्त्री स्वातंत्र्यम् अहर्ते।''

इस वचन में स्त्रियों की मानहानी करनेवाले विचारों को आज की स्त्रीने कालबाह्य बना दिया है। पहले स्त्री को वल्ली की उपमा दी जाती थी वल्ली खडी होती है वृक्षोंके आधार पर, उसी तरह स्त्री भी पुरूषों के आधार पर ही होती है, यह एक भ्रामक कल्पना है। बचपन में पिता का, विवाह के बाद पति का और वृध्दावस्था में पुत्र का आधार स्त्री को लेना पडता है, ऐसा सभी मानवजाति को लगता है। उसे बडी चतुराई से ईश्वरत्व बहाल किया जाता है। 'यंत्र नार्यस्त् पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवतः' ऐसा कहके उसे अंधेरे कमरे में बंद किया जाता है। उसका क्षेत्र सिर्फ रसोईघर ही माना गया है।

स्वार्थ से भरे पुरूषप्रधान समाज में स्त्री भी एक मनुष्य ही तो है। २१वी सदी की स्त्रीने पुरुषी सत्ता को जबरदस्त धक्का दे दिया। उस पर अनेक प्रकार के बंधन है, वह तोडकर उसने अपना मार्ग खुद ढूँढा है। स्त्री के कर्तव्य को सभीने मान्य किया है। कुछ स्त्रीयोंने विश्वविद्यालय के कुलगुरू पद का सन्मान प्राप्त हुआ है। तो भारत के पंतप्रधान पद पर इंदिराजी थी और आज राष्ट्रपती पद पर प्रतिभाजी है। आज स्त्रीने 'अंतरिक्ष' में ही भ्रमण किया है। इतनाही नहीं तो हर यशस्वी पुरुष के पिछे एक स्त्री ही होती है।

मैंने अखबार में एक समाचार पढा की दिल्ली की एक स्त्री पी. बंडोपाध्याय हवाई दल की एअर चीफ मार्शल पद पर विराजमान है। यह सुनकर मुझे खुशी हुई मैं सिर्फ इतनाही कहना चाहती हूँ कि,

''सारे जगमें स्त्री है महान,
गाओ उसका गुणगान।''

●●●

# दो - खत

कु. माधुरी रघुनाथ वागदेकर
बी. ए. भाग २

एक सीमा नाम की लडकी थी, वह स्कूल में बहुत होशीयार थी। उसे हर काम का बहुत लगाव था, हर काम करके भी वह पढाई में होशीयार थी। वह H.S.C परिक्षा अच्छे गुणों से उत्तीर्ण हो गयी। इसलिए उसके पिताजी ने उसे बाहर के कॉलेज में भेज दिया। सीमा ने एफ. वाय. बी. कॉम. में प्रवेश लिया। कॉलेज में उसकी बहूत सहेलियाँ बनी। एक दिन उसकी पहचान उसके ही क्लासमें पढनेवाले संदीप से होती है। उन दोनों की बहूत ही अच्छी पहचान बनती है। वह हर वक्त एक –दूसरे की बाते करते थे। इन बातो में वह एक दूसरे की हर बात जानते गये। इन अच्छी अच्छी बातो में सीमा और संदीप की अच्छी दोस्ती होती है। जैसे उन्हे ऐसा लगता है की,

कुछ कहे बीना हमने पाया है।
कुछ माँगे बीना हमे मिला है।
नाज है हमे अपनी तक्दीर पर
जिसने हमे तुन जैसे दोस्त से मिलाया है।

इन दोनो की इतनी अच्छी दोस्ती होती है की वह दोनो एक दूसरे के सुख- दुःख बॉटने लगे। हर वक्त एक दुसरे के बारे में सोचने लगे। इस दोस्ती को दो साल बित गये और उन दोनों ने टी. वाय. बी. कॉम. में प्रवेश लिया। जब कोई बात होती तो एक दूसरे को कहते। उन दोनो का एक दूसरे पर बहूत भरोसा था। अगर किसीने कुछ भी कहाँ तो वह उसपर विश्वास नही रखते थे। इस दोस्ती में सीमा को संदीप की हर बात अच्छी लगने लगी। और इन अच्छी बातो में सीमा कब संदीप से प्यार करने लगी यह उसको भी पता नही चला। उसकी हर अदा से वह प्यार करने लगी। और उसे भी ऐसा लगता था। की संदीप भी उसे प्यार करता है। उसकी हर बात को वह प्यार समझने लगी। हर वक्त उसके ही बारे में सोचने लगी जैसे वह उसके ही लिए बना था। लेकिन उसे यह पता नही था। की जिंदगी में हर बात सच नही होती। जिंदगी जीते वक्त हम सोचते एक है। और विधी का विधान कुछ और ही होता है। जिस चीज के बारे में हम सोचते नही है वह हमे मिलती है। और जो चीज हमे चाहीए वह किसी और को मिलती है। ऐसा सीमा के साथ होता है। जिस संदीप से वह जी जान से प्यार करती है, वह किसी दूसरी लडकी से प्यार करता है। और यह बात सीमा को पता नहीं थी। वह संदीप से इतना प्यार करती थी की उसके लिए जान भी देने को तैयार थी। लेकिन विधी का विधान कुछ और ही था। क्योंकि सीमा के तक्दीर में संदीप नही था।

तक्दीर बनाने वाले
तुने कमी ना की
अब किस को क्या मिला
यह तो मुक्दर की बात है।

